## प्रकरण चौथे

## महाराष्ट्र राज्याचे उद्योग व वीज म्हणून केलेले कार्य.

(१९६७ - १९७२.)

# प्रकरण चौथे

## मा.राजारामबापू पाटील : महाराष्ट्राचे वीज,व उद्योग मंत्री म्हणून कार्य ( १९६७ - १९७२ )

मा.राजारामबापू पाटील यांनी १९६२ ते ६६ या काळामध्ये महाराष्ट्राचे कॅबिनेट महसूल मंत्री म्हणून केलेले कार्य अतिशय महत्वपूर्ण असे होते.या काळामध्ये त्यांनी शेतक-यांच्यासाठी खाते पुस्तिका तयार करुन दिली.त्याचप्रमाणे छोटया-छोटया वस्त्या व तीनशे लोकसंख्या असणा-या गावाना स्वतंत्र गावाचा दर्जा व स्वतंत्र ग्रामपंचायती देऊन सर्वसामान्य लोकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला.त्याचप्रमाणे जमिन सुधारण्यासाठी महसूल आकार माफ करण्याची तरतूद त्यांनी केली.तसेच महाराष्ट्रातील शेतकरी जमिन मालकांची जमिन साखर कारखान्याकडे खंडाने होती ती सर्व जमिन ' कमाल जमिन धारणा ' कायद्यान्वये ' महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र स्टेट फार्मींग कार्पोरेशन कडे देण्यात आल्याचा निर्णय मा.बापूंनी महसूल मंत्री असताना घेतला होता.तसेच शेतक-यांची थकबाकीसाठी होणारी जमिन जप्ती बंद करुन टाकणे हा निर्णय तर फारच महत्वपूर्ण होता कारण हा निर्णय मा.बापूंनी ज्यावेळी घेतला त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्याशी चर्चा केली.त्यावेळी ते आश्चर्यचकित झाले होते.त्यांनी घेतलेला निर्णय हा वादग्रस्त ठरलेला होता.या निर्णयामुळे त्या काळातसुध्दा काही कोटींच्या घरात जमा होणा-या महसूलावर पाणी सोडावे लागणार होते. शेती उद्योगामध्ये क्रांतिकारक विकास व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने भु-विकास बॅंक आणि इतर शासकीय माध्यमातून शेतक-यांना हजारों रुपयांची वैयक्तिक कर्जे काही कोटींच्या घरात दिली होती. त्यापैकी अनेक कर्जे परतीच्या मार्गावर येत नाही असे दिसताच शेतक-यांच्या जमिनीचे लिलाव पुकारुन जप्ती आणून यापैशाची वसूली करण्यात येत असे . शेतक-याविषयी अलौकप्रेमाचा झरा असणा-या मा.बापूंना ही गोष्ट आवडली

नाही म्हणून त्यांनी ही जप्ती पध्दत बंद केली.मांडी-कुंडी बाहेर काढून त्यांची पत-प्रतिष्ठा धुळीला मिळविण्याचा हा नियम श्री राजारामबापू पाटील यांनी बदलून गोगरगरिब सामान्य शेतकऱ्यांची लाज राखली.त्यामुळे मा.बापूंना लोकांचे नेते असे म्हटले जाते.मा.बापूंना लोकनेते श्री राजारामबापू पाटील असे म्हटले जाते याला महत्वपूर्ण कारण म्हणावे त्यांचे ज्वलंत कार्य होय.[१]

त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या जमिनीतून पाणी नेण्याची परवानगी देण्यात आली.पाण्याची पाईप लाईन रस्त्याच्या कडेने टाकली जात असे,त्यामुळे वेळ,श्रम व पैसा खर्च होत असे. हा खर्च कमी करण्यासाठी दुसऱ्याच्या शेतातून थेट पाणी नेण्याची व्यवस्था मा.बापूंनी केली.ज्या जमिन मालकांच्या शेतातून पाणी नेत असताना उभ्या पिकातून ते नेवू नये .शेतामध्ये पीक नसेल अशा वेळी नांगराच्या किंवा ट्रॅक्टरच्या फाळाला मशागत करताना त्या पिकाची नासाडी न करता पाणी नेण्याची तरतूद केली.[२]

तसेच इंग्रज सरकारने जंगलखात्याचे जाचक नियम केले होते व जमिनीवरील (शेतीतील ) झाडावर अधिकार नव्हता तो अधिकार मा.बापूंनी शेतकऱ्यांना दिला व जमिनीतील सर्व झाडे शेतकऱ्यांच्या मालकीची राहतील असे त्यांनी जाहिर केले अशा अनेक महत्वपूर्ण कार्यामुळेच मा.राजारामबापू पाटील यांना आधुनिक काळातील राजा तोडरमल म्हणून गौरव केला आहे. आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्रातील सर्व समाजावर पडलेला होता.महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्याच्यापेक्षा मा.बापूंनी अनेक भरीव स्वरुपाची कार्य केल्यामुळेच त्यांचा ठसा सर्वत्र उमटलेला होता.या त्यांच्या कार्याची दखल त्यावेळचे मुख्यमंत्री मा.ना.वसंतराव नाईक यांनी देखिल घेतली होती.[३]

सन १९६७ च्या विधानसभेच्या निवडणूकीच्या वेळी वाळवा मतदार संघातून कॉंग्रेस आय चे अधिकृत उमेदवार म्हणून मा.राजारामबापू पाटील यांना घोषित केले.या निवडणूकीच्या वेळी मा.बापूंच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाचे श्री एन.डी.पाटील हे उभे होते. सन १९६७ च्या निवडणूकीमध्ये मा.बापू एकोणीस हजारांनी निवडून आले.मा.बापूंच्यावर विश्वास व्यक्त करण्यासाठी मा.मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी त्यांना महाराष्ट्राचे कॅबिनेट उद्योग व विधीमंत्री म्हणून मंत्रिमंडळात घेतले.[४]

मा.राजारामबापू पाटील यांचे महाराष्ट्राचे उद्योग व विद्युतमंत्री म्हणून केलेले कार्य उल्लेखनीय आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे —

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योग मंत्री असताना मुंबई जवळ पनवेल या ठिकाणी हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स नावाचा कारखाना सुरु करण्याची परवानगी दिली.यामध्ये असणारे कामगार व ऑफिसर्स हे महाराष्ट्रातील नाहीत असे आरोप मा.श्री धुळूप व मा.श्री.डी.बी.पाटील यांनी केल्याबरोबर मा.राजाराम बापू पाटील यांनी क्षणाचाही विलंब न लावता हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स या कारखान्यामध्ये ५० ऑफिसर्स घेतले त्यामध्ये २८ महाराष्ट्रीयन असल्याचे सांगून हे प्रमाण ५६ टक्के इतके आहे. तसेच कुलाबा जिल्हातील ३ आहे व क्लास थ्री मध्ये एकंदर १८८ कामगार असल्याचे सांगून त्या १८८ पैकी १४६ महाराष्ट्रातील असल्याचे व हे प्रमाण जवळ जवळ ७५ टक्के आहे असे ठामपणे सांगितले,त्याच बरोबर त्या कारखान्यामध्ये मॅनेजिंग डायरेक्टर सुध्दा महाराष्ट्रीयन आहे असे त्यांनी सांगितले.[५]

मा.बापूंनी खाजगी उद्योगधंद्यासाठी किंवा सरकारी क्षेत्रात निघणाऱ्या उद्योगधंद्यासाठी ज्यांच्या जमिनी संपादन केल्या जातील त्या लोकांना त्याठिकाणी किंवा जवळपासच्या धंद्यामध्ये कामाला लावण्याच्यादृष्टीने प्रामाणिकपणे प्रयत्न केले.तसेच एम.आय.डी.सी.च्या वतीने ज्या जमिनी घेतल्या जातात त्या जमिनीच्या मालकांना नोकरी दिलीच पाहिजे असा सक्त आदेश त्यांनी काढलेला होता.तसेच निरनिराळे उद्योगपती ज्यावेळी पाणी,वीज,व जागा यासंबंधी सवलती मागतील त्यावेळी जमिनी गेलेल्या लोकांना कामावर घेतले पाहिजे अशी त्या उद्योगपतींच्यावर अट घालण्यात आली.त्यामुळे जमिनी गेलेल्यालोकांना दिलासा मिळाला व त्यांना रोजगार उपलब्ध झाला.[६]

<u>तुर्भे येथील इलेक्ट्रॉनिक कारखाना—</u>

तुर्भे येथील इलेक्ट्रॉनिक कारखाना सुरु करण्यासाठी महाराष्ट्र शासन जमिन,पाणी व वीज तसेच कारखान्यामधील कामगाराच्या निवासासाठी त्यांच्या सोई सरकार करीत नाही,त्यामुळे हा कारखाना तुर्भे येथून हलवून तो आंध्रप्रदेशात

उभारावा असी मागणी होऊ लागताच मा.राजारामबापू पाटील यांनी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री वसंतराव नाईक यांनी तुर्भे येथील इलेक्ट्रॉनिक कारखान्यासाठी जमिन ,पाणी व वीज कमी पडू देणार नाही .तसेच या कारखान्यातील कामगारांना क्वाटर्स बांधण्यासाठी १२५ एकर जमिन बहाल केली. तसेच हा कारखाना उभारणीसाठी ५०० एकर जमिन दिली.परंतु हा भारत सरकारचा पुरस्कृत असलेला तुर्भे येथील कारखाना हालू न देता किंवा आंध्रप्रदेश मध्ये न पाठविता महाराष्ट्रामध्येच कसा स्थिर व भक्कम होईल इकडे कटाक्षाने लक्ष दिले. मा.बापूंनी या ठिकाणी अतिशय अभ्यासू व चिकाटीच्या वृत्तीनेच हा कारखाना महाराष्ट्रामध्ये ठेवून तुर्भे या रिसर्च सेंटरला भक्कमपणा प्राप्त करुन दिला.[७]

महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण --

मा.राजारामबापू पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत महाराष्ट्रातील उद्योगधन्दे जास्तीत जास्त विकसित करुन उद्योगधंद्याच्या वाढीसाठी प्रोत्साहन दिले.राज्याचे औद्योगिक धोरण हे महाराष्ट्रातील सर्व मालमत्ताधार लोकांना पेलेल असे ठरविले. व त्यानुसार खाजगी व सरकारी उद्योगधंद्यांना सर्व सोई उपलब्ध करुन दिल्या. महाराष्ट्राचे औद्योगिक धोरणाचा विकास घडवून आणण्यासाठी मा.बापूंनी तीन मार्ग अवलंबले होते. पब्लिक सेक्टर,को.ऑप.सेक्टर व प्रायव्हेट सेक्टर,हा तीन मार्गांनी उद्योगधंद्याच्या विकास व्हावा असे त्यांनी योजलेले होते. तसेच देशातील सर्वच उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण न करता जेवढे जे कारखाने सरकारला चालविणे शक्य आहे तेवढे ते ताब्यात घेतील व बाकीचे उद्योगधंदे हे प्रायव्हेट सेक्टर व पब्लिक सेक्टर या दोघांनी मिळून जॉईंट सेक्टरमध्ये काढण्याचा व त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्वपूर्ण कार्य मा.बापूंनी आपल्या कारकिर्दीत केले असल्याचे दिसून येते.[८]

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योगधंद्याच्या विकासासाठी तीन गोष्टींची प्रामुख्याने जरुरी असते त्यामध्ये पाणी,वीज व जमिन हाचा समावेश होतो .जेथे हा गोष्टी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतील अशा ठिकाणी नवीन नवीन उद्योग मोठ्या प्रमाणावर निघत असतात.आणि हा सोई उद्योगाना उपलब्ध करुन देण्याचा मा.बापूनी प्रयत्न केला.अशा प्रकारचा प्रयत्न करीत असताना ते

उद्योगधंदे खाजगी सेक्टरमध्ये असोत,को.ऑपरेटिव्ह सेक्टरमध्ये असोत किंवा प्रायव्हेट सेक्टरमध्ये असात .सरकार ते सर्व प्रकारची शक्य ती सर्व मदत देऊन आद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात नियावेत असे जाणीवपूर्वक प्रयत्न केले.तसेच कित्येक ठिकाणी जरुरीप्रमाणे पब्लिक सेक्टरमधील उद्योगधंद्याना सरकारने जमिन देखिल मोफत देण्याची व्यवस्था केली.[९]

महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात व्हावा या हेतूने मा.बापूंनी नाशिक येथील मिंग कारखान्याला तसेच हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स फॅक्टरी(पनवेल ) फॉन्डी फोन प्रॉजेक्टर हा कारखान्यासाठी वर्धा येथे,कोयना ॲल्युमिनियम फॅक्टरीसाठी,राज्य सरकारतर्फे मोफत जमिन(जागा) देण्याची तरतूद केली.तसेच कोयना ॲल्युमिनियम फॅक्टरी हा कारखान्यासाठी कोंकण सारख्या मागासलेल्या भागात उद्योगधंदे काढण्यात यावेत हा दृष्टिकोनातून सवलतीच्या दराने विद्युत पुरवठा करण्याचे ठरवून त्यावेळी २४८ रुपये पर मॅगॅवाट जो विद्युतचा चार्ज होता त्यात कमी करुन हा कारखान्याला फक्त २०५ रुपये दर लावण्याचे मा.बापूनी जाहिर केले,त्यामुळे महाराष्ट्र शासनाला दरवर्षी ५० लाख रुपयाचा तोटा सहन करावा लागणार असल्याचे सांगून केवळ मागासलेल्या भागात उद्योगधंदे वाढावेत त्यांचा सर्वांगीन विकास व्हावा या दृष्टीकोनातून व नुकसान सोसून या कोंकण भागात नवनवीन उद्योगधंदे सुरु करण्याचा व उद्योग धंदे सुरु करणाऱ्या प्रोत्साहन देण्याचे काम मा.बापूंनी प्रामाणिकपणे केले असल्याचे दिसून येते.[१०]

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.श्री.यशवंतराव चव्हाण हे दिल्लीला संरक्षण मंत्री झाल्यानंतर आपल्या राज्यात नाशिक,वरणगांव,बांदा,व नागपूर इत्यादि ठिकाणी डिफेन्स प्रोजेक्टस काढण्यात महत्वाचा वाटा उचलला हा केवळ मागासलेला भाग असल्याने या ठिकाणी उद्योगधंदे सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला होता.मागासलेल्या व कोंकणातील ग्रामीण जनतेला या उपक्रमामुळे दिलासा दिल्याचे दिसून येते.

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योग मंत्री असताना मुंबई,पुणे व पिंपरी इत्यादि भागामधील उद्योगधंद्याचे एकत्रिकरण झाले आहे ते कमी करण्याचा प्रयत्न

करुन मराठवाड्यात देखिल उद्योगधंद्याचा विकास व्हावा या दृष्टीने प्रोत्साहन दिले.तसेच मागासलेल्या विभागात कारखानदारी निघण्याच्यादृष्टीने अशा विभागात कारखाने काढणाऱ्या कारखानदारांना निरनिराळ्या सवलती देण्याचे जाहिर केले व त्याठिकाणी एन.ए.असेसमेन्ट सरकार आकारणार नाही,त्या कारखान्याच्या मालाला सेल्स टॅक्समध्ये सूट,ऑक्ट्राय ड्युटीमध्ये सूट किंवा इतर बऱ्याच सवलती देण्याचे धोरण मा.बापूंनी राज्य सरकारतर्फे जाहिर करुन ह्या सवलतीचा फायदा घेण्यास त्या भागातील लोकांना प्रोत्साहन दिले,त्यामुळे आज कोंकण भागाचा विकास व उद्योगधंद्यामध्ये वाढ झालेली दिसून येते.[११]

त्याच बरोबर नांदेडला औद्योगिक वसाहत उभारण्याच्या सरकारने मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभारावेत या दृष्टीने प्रयत्न केले.तसेच स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संस्थाना देखिल औद्योगिक करण घडवून आणण्यासही सवलती,जागा, पाणी व विज देण्याचे मा.बापूंनी मान्य केले,त्यामुळे नांदेड जिल्हात देखिल औद्योगिक विकासास गती मिळाली.मराठवाड्यामध्ये औद्योगिक विकास महामंडळ होण्याच्यादृष्टीने तेथे मराठवाडा विकास महामंडळ कंपनी स्थापन करुन त्या कंपनीला एक कोटी रुपयांचे भांडवल देण्याचे ठरवून या विकास महामंडळामुळे मराठवाड्याची औद्योगिक विकासाची गरज पूर्ण होऊन या योजनेचा फायदा मराठवाड्यातील सर्व जनतेला होईल या उद्देशाने मा.बापूंनी हे धाडसी पाऊल टाकल्याचे दिसून येते.[१२]

मा.बापूंनी संबंध महाराष्ट्रामध्ये विकेंद्रीकरणाचे धोरण राबविले.काही उद्योगधंदे बाय प्रॉडक्टरवर अवलंबून असल्याने जेथे मुख्य उद्योगधंदा असेल त्या ठिकाणीच किंवा त्यांच्या आजूबाजूला उद्योगधंदे उभे करण्यास प्रोत्साहन दिले.उदा.-- ज्या भागात साखरेचे कारखाने आहेत तेथे निघणाऱ्या उसाच्या चिपाडापासून जर कागद कारखाना काढावयाचा असेल तर तो त्या कारखान्याच्या आसपास कोठेतरी काढावा याचाच अर्थ असा की ज्या ठिकाणी कारखान्याकरिता कच्चा माल मिळत असेल त्या ठिकाणीच किंवा त्या ठिकाणच्या आसपासच त्यापासून तयार होणाऱ्या पक्क्या मालाचा कारखाना काढावा अशी मा.बापूंनी योजना आखली.

तसेच महाराष्ट्र शासनातर्फे विदर्भ आणि कोंकण विभागात जी खनिज

संपत्ती आहे. ती शोधून काढण्याचे महत्वपूर्ण कार्य करुन-चांदा जिल्हात आवश्यक ती खनिज संपती असल्यामुळे तेथे पिग आयर्नचा कारखाना काढण्याचे मा.बापूंनी ठरविले.कोंकणाच्या विभागात अल्युमिनियमचे अनेक साठे सापडल्यामुळे तेथे अल्युमिनियमचा कारखाना पब्लिक सेक्टरमध्ये काढण्यास मा.बापूंनी शासनातर्फे परवानगी दिली व हे काम भारत अल्युमिनियम कंपनी ताब्यात दिले. या कारखान्यापासून अधिक फायदा व्हावा म्हणून या कारखान्याला वीज पुरवठ्याच्या बाबतीत सवलत देण्याचे शासन विचार करीत असल्याचे मा.बापूंनी सांगितले.[१३]

बेळगाव येथे अल्युमिनियम कारखाना--

कोल्हापूरमध्ये मिळणारे बॉक्साईड म्हैसूरला पुरवून त्या भागात कारखाना कां सुरु केला यासंदर्भात मा.श्री.कारखानीस यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मा.बापूंनी सांगितले की आपल्या देशात जास्तीत जास्त कारखाने निघावे अशी शासनाची धारणा असून ज्या गोष्टी आपल्याला करणे शक्य होणार नाही त्या गोष्टी आपल्या मदतीने जर दुसऱ्या राज्यात होत असतील तर त्याकरिता दुसऱ्या राज्याला सहकार्य करणे महत्वाचे आहे.यामध्ये एक कारखाना कोयना विभागात काढण्याचे ठरविले होते. व दुसरा कारखाना कोल्हापूरला काढण्याचे जर एखादी खाजगी कंपनी पुढे आली असती तर त्या गोष्टीचा विचार केला असता.परंतु कारखाना काढीत असताना तो त्या ठिकाणी फायदेशिर होईल की नाही हे पाहिले जाते. म्हैसूरला जो कारखाना निघावयाचा आहे त्याला शरावती प्रोजेक्ट-पासून तयार होणारी वीज मिळणार आहे व कोल्हापूरचे बॉक्साईट या दोन्हीचा उपयोग करुन हा कारखाना बेळगावला निघणार आहे. या कारखान्यात तयार होणाऱ्या ॲल्युमिनियमचा कोटा निश्चित प्रमाणात महाराष्ट्राला देखिल मिळणार आहे व ते ॲल्युमिनियम फॅब्रिकेट करण्याकरिता एक मोठा कारखाना महाराष्ट्रात सुध्दा सुरु करण्यात येणार असल्याचे मा.राजारामबापूंनी अतिशय सूक्ष्मपणे अभ्यासकरुन निर्णय दिला असल्याचे दिसून येते.[१४]

महाराष्ट्र इन्डस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन ची स्थापना --

महाराष्ट्र राज्यामध्ये शक्य तितके जास्त प्रकल्प या राज्यात निघावेत यासाठी प्रयत्नशील राहून त्यासाठी लागतील त्या सर्व सवलती उपलब्ध करुन देण्यासाठी १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र ईन्डस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन या संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यानुसार या संस्थेने फार चांगल्या क्षमतेने काम केले. जर ही संस्था स्थापन केली नसती तर महाराष्ट्रामधील औद्योगिक प्रगती झपाट्याने वाढली नसती. उद्योगधंदे काढण्याच्या दृष्टीने आवश्यक अशा ज्या तीन गरजा आहेत पाणी, वीज व जागा त्या उपलब्ध करुन देण्याचे ही संस्था फार उत्तम प्रकारे कार्यक्षमतेने काम करीत आहे. सरकारी जमीन असेल ती संपादन करावयाची म्हणजे इतर खाजगी जमिनी कमी संपादन कराव्या लागतील. तसेच पिकाखाली असणारी जमिन शक्यतो संपादन करावयाची नाही असे धोरण ठरवून मा. बापूंनी विकासाची अनेक कार्ये पार पाडलेली होती.[१५]

शेतकऱ्यांच्या जमिनी घेत असताना त्यांना त्या ठिकाणी निघणाऱ्या कारखान्यात काम देण्याच्यादृष्टीने मा. बापूंनी प्रयत्न केलेला होता. जवळ जवळ १,१००-१,२०० लोकांना ठाणे-बेलापूर विभागामध्ये कामे देण्याची व्यवस्था केली होती. या कामगिरीसाठी एका खास अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. ज्यांची जमिन कारखान्यामध्ये गेली असेल त्यांची यादी तयार करुन त्यांना निरनिराळ्या कारखान्यामध्ये कामे देण्याची जी व्यवस्था होती ती भारतातील इतर कोणत्याही राज्यात १९६७ च्या वेळी अस्तित्वात नव्हती. ज्या लोकांचे उपजिविकेचे साधन आपण घेतो त्यांना ते साधन निर्माण करुन देण्याचे सरकारने आखले परम कर्तव्य मानले आहे व ते पार पाडण्यासाठी मा. बापू सदैव जागृत राहिले. कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली. म्हणूनच त्यांच्या कारकिर्दीमध्ये औद्योगिक विकासाची अनेक दालने खुली होऊन महाराष्ट्र भरभराटीकडे वाटचाल करु लागलेला होता.[१६]

मा. राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे उद्योग मंत्री असताना जास्तीत जास्त उद्योगधंदे प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक सेक्टर, जॉईन्ट सेक्टर आणि को. ऑप. सेक्टरमध्ये काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेला होता. त्यामुळेच महाराष्ट्रामध्ये कोयना ॲल्युमिनियम प्रोजेक्ट, हिंदुस्थान ऑरग्यानिक ॲण्ड केमिकल्स, पीग आर्यन,

सिमेंटचा कारखाना,खताचा कारखाना इत्यादि अनेक कारखान्याची निर्मिती होऊ शकली. त्याचप्रमाणे मा.बापूंनी महाराष्ट्र राज्याच्या नैसर्गिक परिस्थितीचा जास्तीत जास्त फायदा घेऊन मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे सुरु करण्याचा प्रयत्न केला. विशेषत: समुद्रकाठाचा उपयोग केमिकल्स इंडस्ट्रिजसाठी केलेला होता. कारण केमिकल्स इंडस्ट्रिजला अॅब्लूअंट वॉटरचाही प्रश्न निर्माण होतो व तो प्रश्न समुद्रकिनाऱ्यामुळे आपोआप सुटतो. इतका सुक्ष्म विचार मा.बापूंनी केलेला होता. त्याचप्रमाणे उल्हास नदी किंवा पनवेल जवळ पाताळगंगा,रोहा,चिपळूण जवळ जे बंदर आहे व दाभोळ या ठिकाणी व कोयनेचे पाणी अशा ठिकाणी केमिकल्स इंडस्ट्रिज सुरु केल्या तर महाराष्ट्रामध्ये विकास घडून येईल असे श्री.राजारामबापूंनी सांगितलेले होते.[१६]

## कापड गिरण्यांना प्रोत्साहन दिले --

महाराष्ट्र राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात कापडाचा धंदा आहे आणि कापडाविषयी महाराष्ट्र राज्य हे सुप्रसिध्द आहे यासाठी या महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी कापड गिरण्या निघाव्यात यासाठी मा.बापूंनी प्रयत्न केले. अनेकांना लघुउद्योगधंदे सुरु करण्यास प्रोत्साहन दिले, त्यामुळे महाराष्ट्रामध्ये कापड गिरण्याचे जाळेच पसरले गेले व पॉवर लूमची संख्या वाढू लागली. या कामामध्ये मा.बापूंनी भारताचे उद्योगमंत्री मा.श्री.फकरुद्दीनअली अहमद हे जेव्हा मुंबईत आले त्यावेळी महाराष्ट्राचे अर्थमंत्री व मजूरमंत्री,यांच्यासमवेत चर्चा केली व यातून योग्य दिशेने वाटचाल करण्याच्या प्रयत्न केला. राज्य विकसित करीत असताना त्यांनी आपल्या कामामध्ये कधीही अंगचुकारुपणा केला नाही.व प्रत्येक कार्य मा.बापूंनी निर्धाराने केले.त्यांनी कद्रू नितीचे राजकारण कधीच केले नाही हे दिसून येते.[१७]

## महाराष्ट्र स्टेट फायनन्सियल कार्पोरेशनची निर्मिती --

महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र स्टेट फायनान्सियल कार्पोरेशनची स्थापना करुन त्यामध्ये राज्यातील स्मॉल स्केल इंडस्ट्रिजना मदत करण्याकरिता या संस्थेमार्फत लहान लहान उद्योगधंद्याना मोठ्या प्रमाणात कर्ज देण्याची व्यवस्था केली आहे. तर काही उद्योगधंद्यांना स्टेट एड टू इंडस्ट्रिज या योजनेखाली कमी व्याज दराने कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली. या संस्थेच्या कामी ज्या संस्था जास्तीत जास्त

फायदा करून घेतील त्यांना कमी दराने पैसे मिळतील.त्याच बरोबर स्टेट इंडस्ट्रिज ॲण्ड इन्व्हेस्टमेन्ट कार्पोरेशन ची स्थापना करून या संस्थेच्या वतीने निरनिराळ्या धंद्यात भांडवलाची गुंतवणूक करण्यात येते. जर एखादा कारखाना चांगल्या रितीने चालविण्यास एखादी कंपनी पुढे आली तर कारखान्यामध्ये ही संस्था आपले भांडवल गुंतविण्यास तयार असल्याचे ठामपणे मा.बापूंनी सूचित करून महाराष्ट्रामध्ये आणि संबंध देशभर जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणामध्ये उद्योग धंद्याचा विकास व्हावा यासाठी त्यांनी उद्योजकांना वीज,पाणी व जागा याची कमतरता पडू देणार नाही असे सांगितले,त्यामुळेच मुंबई,पुणे,मराठवाडा,नांदेड, सोलापूर ,कोल्हापूर,अंकोला इत्यादि अनेक महत्वपूर्ण शहरामध्ये उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात वाढीस लागले.

<u>पक्षपातीपणा न करता उद्योगधंद्याना प्रोत्साहन --</u>

मा.बापूंनी पक्षदृष्टी कधीच ठेवली नाही व उद्योगधंदा वाढविण्यामध्ये कधीच पक्षास येवू दिले नाही हा कॉंग्रेस पक्षाचा हा विरोधी पक्षाचा असा पक्षपाती पणा मा.बापूंनी आपल्या कारकिर्दीत कधीच केला नाही. राज्याच्या व देशाच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने उद्योगधंदे जास्तीत जास्त वाढावेत व जास्तीत जास्त लोकांना कामे मिळावित हाच हेतू मनासमोर ठेवून त्यांनी कार्य केले. फायनान्स कार्पोरेशन द्वारे पैसा देण्याचे काम केले. महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रिज डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन याच्या द्वारे उद्योगधंद्याना लागणारा कच्चा माल निर्यात करण्याचे काम सोपविले.त्याच बरोबर महाराष्ट्र इन्डस्ट्रियल इन्व्हेस्टमेन्ट कार्पोरेशन यांच्याकडे पैसा पुरविण्याचे व पाणी,जागा व विज उपलब्ध करून देण्याचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याचेकडे सोपविले.तसेच पोलिस स्टेशन,ऑफिस कॅन्टीन , एस.टी.च्या बसेस इत्यादि सोईही त्याच संस्थेच्या मार्फत करण्याची तरतूद केली.

इंडस्ट्रिज एरियामध्ये कामगारांना राहण्याकरिता घरे बांधण्याची योजनाही आखली,त्याचप्रमाणे टेस्टाईल कार्पोरेशन नावाची एक संस्था नव्यानेच स्थापन करून बंद पडलेल्या कापड गिरण्यामुळे जे कामगार बेकार होतात त्याना नवीन गिरण्या काढून देण्याचा प्रयत्न या संस्थेकडून करण्याची व्यवस्था केली.तसेच सोलापूर ,अकोला, हिंगणघाट व औरंगाबाद या चार ठिकाणी प्रथमत: प्रयोगासाठी नवीन गिरण्या

काढण्याचा प्रयत्न या संस्थेमार्फत होत असल्याची तरतूद करुन या संस्थेमार्फतच कोल्हापूरची शाहू गिरणी या कार्पोरेशनला चालविण्यास दिली असल्याचे मा.बापूंनी सांगितले.[१८]

चंद्रपूर येथील औद्योगिक वसाहत --

मा.श्री.तुमपल्लीवार (चिमूर) यांनी चंद्रपूर येथील औद्योगिक वसाहतीत कोणकोणते उद्योग सुरु आहेत, किती वसाहतीत शेडस आहेत व त्यापैकी किती सध्या रिकामे आहेत व शेडस साठी आलेले किती अर्ज सध्या विचारधीन आहेत असा प्रश्न उपस्थित करताच मा.राजारामबापू पाटील यांनी चंद्रपूर औद्योगिक वसाहतीत एक रसायनाचा व एक टाईल्स बनविण्याचा असे दोन कारखाने सुरु असल्याचे सांगून वसाहतीत सहकारी संस्थेतर्फे बांधलेले सहा व कारखानदारांनी स्वखर्चाने बांधलेले दोन असे एकूण आठ शेडस आहेत व हे सर्व शेडस कारखानादारांना कारखाने काढण्यासाठी दिलेले असल्याने वसाहतीत रिकामे शेडस नाहीत .तसेच औद्योगिक वसाहती सरकारी संस्थेतर्फे स्थापन करण्यात येत असून वसाहतीत सदर संस्थेच्या सभासदांसाठीच फक्त शेडस बांधण्यात येतात.जशजशा शेड बांधून होतील तसतशा त्या संबंधित सभासदांना कारखाना काढण्यासाठी देण्यात येतात. त्यामुळे अर्ज असण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे मा.बापूंनी लेखी उत्तर मा.श्री. तुमपल्लीवार यांना दिले.[१९]

विकासाच्यादृष्टीने सर्व खात्यामध्ये महत्वाचे म्हणजे उद्योग खाते होय -

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये अनेक खाती आहेत.त्या सर्वांमध्ये विकासाच्यादृष्टीने दोन महत्वाची खाती आहेत ती म्हणजे शेती आणि उद्योग होय.यापैकी उद्योग हे एक महत्वाचे खाते आहे.पंचवार्षिक योजनामध्ये उद्योगधंदे आणि शेती यावर अधिक भर दिला असल्यामुळे या दोन्हीही क्षेत्रातील प्रगती मोठ्या प्रमाणात होत चाललेली आहे. ही प्रगती आपल्या देशाचे औद्योगिक धोरण यावरच ख-या अर्थाने अवलंबून आहे हे धोरण अमेरिकेच्या तोंडाकडे पाहून किंवा रशियाचे ऐकून आखण्यात आलेले नाही.तर सर्व देशांच्या औद्योगिक धोरणाचा अभ्यास करुन मगच आपल्या देशातील परिस्थितीची पहाणी करुन आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन तसेच या देशातील नैसर्गिक

परिस्थितीची माहिती घेऊन आपले आद्योगिक धोरण ठरविणे महत्वाचे आहे . व वरील सर्व गोष्टीला योग्य पध्दतीने महत्व दिल्यामुळे आज देशामध्ये व महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्याचा विकास झाल्याचे दिसून येते.[२०]

हुंडणावळीचा प्रश्न --

कोणत्या उद्योगधंद्याला किती फॉरेन एक्सचेंज उपलब्ध करुन द्यावे यासंबंधीचे धोरण केन्द्र सरकारने ठरविले नाही तर भरमसाठ नफा मिळविणारे फॉरेन एक्सचेंज घेवून मोकळे होतील आणि जे धंदे राष्ट्राच्या विकासाच्यादृष्टीने महत्वाचे आहेत. त्यांना फॉरेन एक्सचेंज नियमित करण्याच्या दृष्टीने मोठ्या व मध्यम उद्योगधंद्याची परवानगी केन्द्र सरकारने आपल्याकडे ठेवलेली आहे.असे अनेक उद्योगधंदे केन्द्र सरकारच्या परवानगीने काढता येतात. निरनिराळ्या खाजगी क्षेत्रामध्ये उद्योगधंदे काढणाऱ्या लोकांना केन्द्र सरकारकडे अर्ज करावा लागतो. आणि अर्ज केल्यावर केन्द्र सरकार आपल्या लहरीनुसार परवानगी देत नसून यासंदर्भात राज्य सरकारचा सल्ला घेवून राज्यसरकारच्या शिफारशीनुसार केन्द्र सरकार त्या कारखान्याला परवानगी देत असते.ज्या धंद्याची आपल्या राज्यात आवश्यकता आहे व जे धंदे काढण्याला आपल्या राज्यात पोषक असे वातावरण आहे.अशाच धंद्याची केन्द्र सरकारकडे शिफारस केली जाते. मात्र छोटे उद्योगधंदे हे राज्य सरकारच्या कक्षेत ठेवण्यात आलेले आहेत.या राज्यातील उद्योगधंद्याची प्रगती घडवून आणण्यासाठी उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण केले जाईल किंवा ते को. ऑपरेटिव्ह सेक्टर मध्ये ठेवून नियंत्रण ठेवावे लागेल.महाराष्ट्रामध्ये सहकाऱ्याच्या क्षेत्रानुसार कारखान्याचे काम किती उत्तम चालले आहे व हे काम खाजगी कारखान्यापेक्षा ही अतिशय चांगले चालल्याचे मा.राजारामबापू पाटील यांनी सांगितले.[२१]

महाराष्ट्रातील साखर कारखान्याला प्रोत्साहन --

महाराष्ट्रामध्ये उद्योग-विकास मोठ्या प्रमाणात घडून यावा यासाठी मा. राजारामबापू पाटील यांनी साखर कारखान्याला प्रोत्साहन दिले.१९६७ अखेर या महाराष्ट्रामध्ये एकूण २० साखर कारखाने होते पण त्यापेक्षाही अधिक साखर कारखाने या राज्यात निघावेत यासाठी आणखी २० नवीन साखर कारखाने सुरु

व्हावेत अशी मा.बापूंनी केन्द्र सरकारकडे शिफारस केली.त्याच बरोबर स्पिनिंग मिल्स,ऑईल मिल्स यांच्याकडे लक्ष देऊन त्याचाही विकास घडवून आणला. कोणत्याही उद्योगासाठी कच्चा माल महत्वाचा असतो व तो माल शेतकऱ्यांनी निर्माण करावयाचा असतो.सरकार सहकारी संस्थाना धंदा सुरु व्हावा यासाठी मॅचिंग कॉन्ट्रीब्युशन देत असते.तसेच काही जॉईंट सेक्टरमध्ये उद्योगधंदे सुरु करण्याला सरकार प्रोत्साहन देत असते.काही ठिकाणी खाजगी क्षेत्रामध्ये भांडवलाकरिता सर--कारने मदत करुन काही कारखाने या राज्यामध्ये उभारलेले आहेत.तसेच उद्योगधंदा काढण्यासाठी कोणीही उभे राहिले तरी त्याला परवानगीचे धोरण मा.बापूंनी आखलेले होते. त्यामुळेच देशाची व महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती झपाट्याने झाल्याचे दिसून येते.[२२]

<u>औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्याना पाठींबा दिला</u> --

मा.बापूंनी औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या विभागात प्रगती घडवून आणून त्या राज्यामध्ये उद्योगधंदे वाढीला चालना दिली.यासाठी मुंबई ,पुणे व ठाणे या परिसराबाहेर जर कोणी उद्योगधंदे काढीत असतील तर त्यांना लवकर परवानगी देण्याचे धोरण शासनाने ठरविले.याशिवाय हे उद्योगधंदे या शहरी परिसराच्या बाहेर जावेत म्हणून त्यांना सर्व सोई उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने महत्वाची पावले उचलली. तसेच जे उद्योगपती मुंबई व पुणेच्या बाहेर उद्योगधंदे सुरु करतील अशांना जागा,पाणी व विज उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने व मागासलेल्या भागात औद्योगिक क्षेत्राची वाढ व्हावी या उद्देशाने नागपूर व नाशिक,आणि औरंगाबाद येथे जमिन ॲक्वायर करुन ठेवली,त्यामुळेच मागासलेल्या भागात देखिल उद्योग विकासाची गंगा वाहू लागली.[२३]

<u>सोलापूरला औद्योगिक क्षेत्र म्हणून महत्वपूर्ण स्थान</u> --

महाराष्ट्रामध्ये उद्योगविकास मोठ्या प्रमाणात वाढावा त्याचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने मा.राजारामबापूंनी पुणे व मुंबई सारख्या मोठ्या शहराबाहेर १६ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली. व या कामासाठी आठ हजार एकर जमिन ताब्यात घेऊन ती उद्योगधंदा सुरु करणाऱ्या व्यक्तींच्या ताब्यात दिली, या १६ औद्योगिक क्षेत्रामध्ये नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याची व त्या उद्योगधंदाना

मदत करण्याची त्यांना प्रोत्साहन देण्याची जबाबदारी उद्योगमंत्री या नात्याने श्री.मा.बापूंनी घेतलेली होती.[२४]

आद्योगिक वसाहती व आद्योगिक क्षेत्र यातील फरक --

मा.श्री.राजारामबापू पाटील अतिशय सूक्ष्मपणे अभ्यास करुन मा.कृ.ना. घुळप यांना उत्तर देवून वसाहती व क्षेत्र यातील फरक समजावून दिला आहे. आद्योगिक वसाहत म्हणजे लोकांनी एकत्रित येऊन सहकारी पध्दतीवर उद्योगधंदे त्या ठिकाणी काढणे. स्वत:च्या इमारती बांधल्या त्यांना औद्योगिक वसाहती म्हणतात आणि आद्योगिक क्षेत्र म्हणजे इंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनमार्फत निघालेले उद्योगधंदे आणि ज्या ठिकाणी असे उद्योगधंदे निघालेल्या मोकळ्या एरिया आणि त्यांनी बांधलेल्या इमारती.

ज्या आद्योगिक वसाहती असतात त्या विकसित होण्यासाठी सरकार आद्योगिक वसाहतीच्या लोकांना २० टक्के शेअर कॅपीटल जमविण्यास सांगते तर २०टक्के शेअर सरकार विकत घेते. आणि बाकीचे ६० टक्के शेअर कॅपिटल सरकार त्यांना एल.आय.सी.कडून देते हे शेअर कॅपीटल कर्ज म्हणून मिळवून देते व अशा रितीने उद्योगधंद्यांना आर्थिक सहाय्य मिळवून देऊन त्याच्यात प्रगती घडवून आणण्याचे काम सरकार करीत असल्याची माहिती मा.राजारामबापू पाटील यांनी मा.श्री. घुळप यांनी विचारल्यानंतर दिलेली आहे.[२५]

जिल्ह्याचे ठिकाणी इंडस्ट्रिज इन्स्पेक्टरची नियुक्ती --

राज्यामध्ये जास्तीत जास्त उद्योगधंदे वाढावेत यासाठी या उद्योगासाठी त्याठिकाणी पोषक असे वातावरण,आर्थिक दृष्टया तेथे योग्य परिस्थिती आहे की नाही.तसेच त्याठिकाणी जमीन,पाणी व वीज इत्यादि सर्व सोई आहेत का, तसेच तेथील सर्व लोक त्या उद्योगासी सहमत आहेत हे काळजीपूर्वक पहाण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच उद्योगधंदे कोठे सुरु करावेत याचे मार्गदर्शन करण्यासाठी मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी उद्योगमंत्री असताना प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी इंडस्ट्रिज इन्स्पेक्टर किंवा इंडस्ट्रिज ऑफिसरची सोय उपलब्ध करुन दिली.[२६]

## महाराष्ट्र स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन ची स्थापना --

मा.बापूंनी महाराष्ट्र स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशनची स्थापना करुन या राज्याच्या वतीने लघु-उद्योगधंदयांना लागणारा कच्चा माल,लोखंड इत्यादी मोठ्या प्रमाणात पुरविण्याची व्यवस्था केली.इतकेच नव्हे तर केन्द्र सरकार आणि राज्य सरकार यांनी या ऑर्डर्स स्वीकारुन तो माल लघु-उद्योगांना त्यांच्या कामासाठी पुरविण्याची व्यवस्था केली. हे कार्य देशातील आणि महाराष्ट्रातील लघु-उद्योगधंदयांना माल पुरविण्याच्यादृष्टीने या संस्थेतर्फे टाकलेले हे पाऊल स्तुत्य असल्याचे दिसून येते.[२७]

## महाराष्ट्र राज्य आद्योगिक गुंतवणूक मंडळ --

महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या अनेक संस्था निर्माण केलेल्या आहेत,त्याच प्रमाणे महाराष्ट्र राज्य आद्योगिक गुंतवणूक मंडळ या नावाची एक संस्था १९६६ पासून सुरु करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत नवीन उद्योगधंदे काढण्याचा प्रयत्न केला जातो.तर काही उद्योगधंदयाना लोन (कर्ज ) मिळवून देण्याची व्यवस्था सुध्दा ही संस्था करते.या संस्थेची स्थापना झाल्यापासून या संस्थेने फार मोठे काम केलेले आहे.

त्याचप्रमाणे' मराठवाडा डेव्हलपमेन्ट बोर्ड ' नावाची एक संस्था स्थापन करुन मराठवाड्यातही आद्योगिक विकास घडून यावा या संस्थेचे ,काम व्यवस्थीतपणे चालावे यासाठी महाराष्ट्रातील प्रसिध्द उद्योगधंदयाचे मालक श्री अरविंद मफतलाल यांची या संस्थेचे अध्यक्ष (चेअरमन ) म्हणून निवड केली आहे. अशारितीने उद्योग धंदामध्ये प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न मा.बापूंनी प्रामाणिकपणे केले असल्याचे दिसून येते. उद्योग विकास घडवून आणण्यासाठी अनेक आद्योगिक संस्थाचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न या काळामध्ये ख-या अर्थाने झालेला होता म्हणून आद्योगिककरणा - चे श्रेय मा.बापूंनी मिळविले.[२८]

भू-विज्ञान - खाण उद्योग --

मा.राजारामबापू पाटील यांनी भू-विज्ञान व खाण कामगार संचलनाल्याकडून या राज्यातील खनिज संपत्तीची पहाणी केली जात असल्याचे सांगून या खनिज संपत्तीचा या राज्याच्या आद्योगिक वाढीच्यादृष्टीने उपयोग व्हावा यासाठी राज्यातील दगडी ,कोळसा,चुनखडी,लोखंड,बॉक्साईट याचे प्रचंड साठे निरनिराळ्या भागात आहेत त्याचा शोध घेवून त्याच्या आधारावर अनेक उद्योगधंदे सुरु करण्यास नॅशनल कोल डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनमार्फत प्रोत्साहन देण्यात येत असल्याची तरतूद मा.बापूंनी करुन नागपूर विभागामध्ये उमरेड,सिलेवारा या ठिकाणी दोन कोळशाच्या खाणी सुरु केल्या व महाराष्ट्र राज्यामध्ये आद्योगिक विकास व्हावयाच असेल तर विकासाच्या दृष्टीने विजेची आवश्यकता आहे व ती वीज निर्माण करण्याकरिता लागणारा कोळसा उपलब्ध केला.एन.सी.डी.सी.च्या वतीने नागपुर, नाशिक इत्यादी ठिकाणी कोळशावर आधारित आद्योगिक वाढ होण्याकरिता मुलगामी स्वरुपाची खनिज संपत्ती शोधून काढून आद्योगिक विकास होण्याला मदत उपलब्ध करुन दिली. व या पावर स्टेशनला ६० वर्षापर्यन्त पुरेल इतका कोळसा मिळू शकेल याची तरतूद मा.बापूंनी केली.[२९]

यवतमाळ येथे चुनखडीचा कारखाना--

यवतमाळ येथे व चांदा जिल्हातील भिगूस या ठिकाणी चुनखडीचा साठा मोठया प्रमाणात असल्यामुळे चुनखडीच्या साठयावर आधारित मा.बापूंनी सिमेंटचा कारखाना सुरु केला. व त्यासाठी असोसिएटेड कंपनीला परवानगी देऊन त्या भागात ते काम चालू ठेवले.चनाका येथे लाईम स्टोनचा साठा आहे ,त्यामुळे त्या ठिकाणी दुसरा कारखाना त्यांनी चालू करण्यात परवानगी दिली.

त्याचप्रमाणे लोखंडाचा मोठा साठा चांदा व रत्नागिरी येथे सापडल्याने त्या ठिकाणी चौगुले अॅण्ड कंपनी या खाजगी कंपनीला लेटर ऑफ इन्टेट दिली, त्याच बरोबर जागाही दिली व त्या कंपनीनुसार त्याठिकाणी कारखाना सुरु करणार असल्याचे मा.बापूंनी सांगितले.कोळशाचे साठे कमी प्रमाणात सापडतात ते जास्त मोठया प्रमाणात सापडावेत यासाठी राज्यपातळीवर प्रयत्न करीत असल्याचे मा.बापूंनी सांगितले.[३०]

<u>उद्योग धंदे वाढविण्यास प्रोत्साहन दिले --</u>

मा.राजारामबापू पाटील उद्योग मंत्री असताना त्यांच्या कारकिर्दीत मोठ्या प्रमाणात आद्योगिक विकास झाल्याचे दिसून येते,याची आकडेवारी पाहिली तर ते आपणास दिसून येईल.महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळाने जी निरनिराळ्या उद्योगांना मदत केली ती १९६३-६४ मध्ये रु.८६ लक्ष,१९६४-६५ मध्ये दोन कोटी व १९६७-६८ चा आकडा जर पाहिला तर तो ६ कोटी रुपयावर गेलेला दिसून येतो.त्याचप्रमाणे या महामंडळाने जी निर्यात केली आहे ती १९६५-६६ साली ९३ लक्ष रुपये होती.सन १९६६-६७ साली ४.३४ कोटी रुपयाची होती आणि १९६७-६८ साली ५.८३ कोटीच्या वर गेलेली होती. त्याचप्रमाणे विदर्भ महामंडळाने सन १९६३-६४ साली ३ कोटी २२ लक्ष रुपयांची मदत केली.१९६४-६५ साली ४ कोटी ०९ लक्ष रुपयाची मदत केली. सन १९६५-६६ साली १ कोटी ३६ लक्ष रुपयांची आणि १९६६-६० साली ३ कोटी ६६ लक्ष रुपयाची मदत केली होती.या वरील माहितीवरुन फक्त मुंबईमध्येच या मदतीचा फायदा घेण्यात येतो असे न म्हणता विदर्भ मध्येही मदत दिली असल्याचे दिसून येते.मराठवाड्यातही ३१-३-१९६२ पर्यन्त २ उद्योगधंद्यांना २ लक्ष रुपये दिले आणि त्यानंतर ३१-३-१९६७ पर्यन्त १०० उद्योगांना ५२ लक्ष रुपये देण्यात आल्याचे सांगून मुंबईच्या बाहेरही उद्योग धंद्याना राज्यशासनातर्फे मदतीचा फायदा देण्यात आल्याचे त्यांनी दाखवून दिले.विदर्भ विभागात ३१-३-१९६२ पर्यन्त ६१ उद्योगांना ४३ लक्ष रुपयाची मदत केली हा आकडा पुढे ३१-३-६७ पर्यन्त १४४ उद्योगांना ८४ लक्ष रुपयांच्या मदतीपर्यन्त गेला असून पुणे विभागातही पुणे सोडून जो भाग आहे त्यात ३१-३-६९ पर्यन्त ११४ उद्योगांना ३ कोटी रुपयांची मदत करण्यात आली व ३१-३-६७ पर्यन्त ३२० उद्योगांना आणखी ३ कोटी रुपयाचीच मदत केली असल्याची माहिती मा.बापूंनी श्री धुळूप यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना दिली असल्याचे आपणास दिसून येते.मा.बापूंनी अतिशय सूक्ष्मपध्दतीने व बारकाईने ही जी आकडेवारी दिली आहे त्यावरुन त्यांच्या कार्याची आपणास चांगलीच ओळख होती.[३१]

बल्लारशा येथे कागद कारखाना --

महाराष्ट्र राज्यात उद्योगधंद्याचे जाळे पसरावे यासाठी जशी परिस्थिती अनुकूल असेल जो माल ज्या ठिकाणी मिळेल त्या कच्च्या मालाचा उपयोग मोठया प्रमाणात करुन मा.बापूंनी उद्योगमंत्री असताना उद्योगधंद्याना व लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले.राज्यामध्ये बांबूची संख्या मोठी होती.परंतु हा बांबू दुसऱ्या राज्यात जात होता म्हणून या बांबू पासून कागदनिर्मिती करता यावा यासाठी मा.बापूंनी महाराष्ट्र राज्यात बल्लारशा येथे एक कागद गिरणी चालू करण्याची परवानगी दिली त्यामुळे बांबू दुसऱ्या राज्यात जाणे बंद झाले व आणखी असे बांबूपासून कागद कारखाने काढणाऱ्यास सर्व बाबतीचे सहकार्य केले जाईल असे सांगून त्याना प्रोत्साहन देण्याचे कार्य मा.बापूंनी केले.[३२]

राज्यातील उद्योगधंद्यांच्या बाबतीत शासन योग्य ती दक्षता घेत नाही म्हणून राज्यातील कित्येक उद्योगधंद्याच्या इतर राज्यात होणाऱ्या स्थलांतराबाबत नियम १०४ अन्वये सर्वश्री मा.पिंटो व मा.श्री.रा.का. म्हाळगी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना --

मा.राजारामबापू पाटील यांनी आद्योगिक विकासात महाराष्ट्र राज्य देशातील आघाडीवरच्या राज्यांपैकी एक असल्याचे सांगून महाराष्ट्र उद्योगधंद्यात पुढे असल्याचे दिसले असले तरी हे उद्योगधंदे मुंबई शहराचा आसमंत आणि मुंबई, ठाणे,खापोली ,पुणे-पिंपरी या भागातच मुख्यत: एकवटलेले आहेत.व राज्यातील उरलेला भाग हा आद्योगिकदृष्टया अविस्मरणिय राहिला आहे.हा असमतोल दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे अनेक प्रयत्न चालू असल्याचे सांगून उद्योगधंद्याचे विकेंद्रिकरण होण्यासाठी काही सवलती जाहिर केल्या आहेत.महाराष्ट्रामध्ये उद्योगधंदे जलद गतीने व व्यवस्थित रितीने स्थापन करणे,त्याची वाढ करणे व त्यांचा विकास करणे,नवीन उद्योगधंदे अस्तित्वात आणून त्याना आर्थिक सहाय्य देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खालील महामंडळे स्थापन केली असल्याचे मा.बापूंनी सांगितले ,ती महामंडळे खालीलप्रमाणे --

१) महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळ,

२) महाराष्ट्र लघु उद्योगधंदे विकास महामंडळ,

३) महाराष्ट्र राज्य विक्रिय महामंडळ,

४) महाराष्ट्र आद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ महाराष्ट्र लि.,इत्यादि.

महामंडळे स्थापन करुन आपआपल्या क्षेत्रामध्ये हे महामंडळ कार्य करीत आहेत.

राज्याच्या निरनिराळ्या भागामध्ये आद्योगिक वसाहती व आद्योगिक क्षेत्रे स्थापन करण्याच्या कामाचा शासन कशोशिने पाठपुरावा करीत असून दुस-या पंचवार्षिक योजनेत दहा आद्योगिक वसाहती स्थापन झाल्या तर तिस-या योजनेत स्थापन झालेल्या या वसाहतीची संख्या ३१ आहे.याशिवाय महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाने तिस-या योजनेच्या काळात १७ आद्योगिक क्षेत्राची स्थापना केली व १५ क्षेत्राच्या स्थापनेची प्राथमिक तयारी केली आहे.

राज्यामध्ये उद्योगधंद्याची वाढ व्हावी आणि असलेले उद्योग अविकसित भागात विखुरले जावेत आणि उद्योगधंद्याबाबतीत समतोल निर्माण व्हावा म्हणून शासनाने एक खास कार्यक्रम हाती घेतलेला आहे,त्यामध्ये खालील गोष्टीचा समावेश आहे.

१) महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळातर्फे आद्योगिक क्षेत्राची आणि आद्योगिक वसाहतीची स्थापना करुन कारखानदारास सवलतीच्या दरात जागा व शेडस उपलब्ध करुन देणे.

२) उद्योगधंद्यास कर्ज देण्याच्या राज्य शासनाच्या योजनेनुसार मुंबई,पुणे, क्षेत्राबाहेर उद्योग काढणा-यास सवलतीच्या दराने कर्ज देणे.

३) महाराष्ट्र राज्य आद्योगिक गुंतवणूक महामंडळाची स्थापना करणे.

४) घरबांधणी व उद्योगधंद्याच्या उभारणीच्या खर्चाबाबत सहाय्य .

५) बांधकामाचा माल कर्जावर उपलब्ध करुन देण्याची तजवीज देण्यात येते.

६) कच्च्यामालाच्या खरेदीत अग्रहक्क देण्यात येतो.

७) तज्ञांच्या शिक्षणाच्याबाबतीत मदत करण्यात येते.

तसेच नवीन उद्योगधंदे उभारण्यासाठी केन्द्र सरकार कडून लागणारे परवाने जास्तीत जास्त लौकर उपलब्ध व्हावेत म्हणून निव्वळ शिफारस करुन महाराष्ट्र शासन बसत नाही तर त्यासाठी परवानाविषयक समित्यातही यासाठी आग्रह धरते.

राज्य शासनाकडून अमूक एक सवलत मिळत नाही म्हणून कोणत्याही कारखानदाराला आपला कारखाना दुसऱ्या राज्यात हलविण्याची किंवा नवीन कारखाना त्या ठिकाणी काढण्याची वेळ आजपर्यन्त आलेली नाही व भविष्य काळातही तशी वेळ येऊ दिली जाणार नाही. त्याबद्दल शासन नेहमीच जागृत असल्याचे मा.बापूनी सांगितले.[३३]

महाराष्ट्र आद्योगिक विकास करण्याच्या हेतूने शासनाने स्थापन केलेल्या महामंडळाच्या कार्याचा संक्षिप्त तक्ता --

या महामंडळाने स्थापन केलेल्या आद्योगिक क्षेत्रामध्ये ३५० कारखाने व आद्योगिक वसाहतीमध्ये ७६० कारखाने काढण्यात आले आहेत. या महामंडळाने जमिनीचा विकास उद्योगधंद्याना लागणाऱ्या इतर आवश्यक सोई उपलब्ध करुन देण्याच्या कार्यासाठी १९६६-६७ अखेरपर्यन्त रु.३,२६,९७,६७२ इतका खर्च केला आहे.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

या महामंडळाने १९६६-६७ मध्ये एकूण ८२ कारखान्यांना कर्ज मंजूर केली आहे. हे ८२ कारखाने खाली दिलेल्या विभागातील आहेत --

मुंबई विभाग

| | | |
|---|---|---|
| बृहन्मुंबई | कारखान्यांना कर्ज | ०९ |
| ठाणे-कुलाबा | ,, | १३ |
| इतर जिल्हे | ,, | ०५ |
| पुणे विभाग | ,, | २२ |
| विदर्भ विभाग | ,, | ०८ |
| मराठवाडा विभाग | कारखान्यांना कर्ज | २५ |
| | एकूण | ८२ |

## महाराष्ट्र राज्य आद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ --

या महामंडळाची स्थापना हल्लीच झालेली असून महाराष्ट्र राज्याच्या अविकसित विभागात उद्योगधंद्याचा विकास करणे हे महामंडळाच्या कार्याचे उद्दिष्ठ आहे. त्यानुसार महामंडळाची तातडीची कामे खालीलप्रमाणे आहेत :--

१) अविकसित विभागातील उद्योगधंद्यांना (अ) त्यांच्या भांडवलास मदत करुन (ब) त्याना दीर्घ मुदतीची कर्जे देऊन आणि (क) इतर वित्तिय संस्थाकडून आर्थिक सहाय्य मिळविण्याची हमी देऊन मदत करणे.

२) स्वत:हून सरकारी क्षेत्रात व संयुक्त क्षेत्रात उद्योगधंदे पुरस्कृत करणे.

३) प्रमुख आद्योगिक विभागात मूलभूत आद्योगिक सोई सुरु करणे. या महामंडळाची स्थापना झाल्यानंतर त्यांनी अल्पावधित तीन कर्जाच्या बाबतीत १८ लाख रुपयांचे वित्तीय सहाय्य मंजूर केले आहे व बाकीचे बारा अर्ज महामंडळाच्या विचाराधीन असल्याचे मा. राजारामबापूंनी सांगितले.

## महाराष्ट्र लघु उद्योगधंदे विकास महामंडळ --

या महामंडळाने १९६६-६७ मध्ये ७६ कारखानदारांना सुमारे १० लाख रुपये किंमतीची हायर परचेस स्कीम खाली यंत्रसामुग्री दिली. ७८ लाख रुपये किंमतीची पेस्टिसाईड्स विकली. सुमारे ४ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात केला. सुमारे आडीच कोटी रुपये किंमतीच्या कच्च्या मालाचे वाटप केले.

वरीलप्रमाणे माहिती देऊन राज्यातील कित्येक उद्योगधंद्यांच्या इतर राज्यात होणाऱ्या स्थलान्तराबाबत लक्षवेधी सूचनेवर मा. राजारामबापू पाटील यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. ती फारच उपयुक्त आहे.[३४]

## महाराष्ट्र राज्यातील आद्योगिक विकास व अनुषंगिक समस्या विचारात घेण्यासंबंधी प्रस्ताव --

मा. राजारामबापू पाटील यांनी उद्योगमंत्री असताना महाराष्ट्र राज्यातील आद्योगिक विकास व अनुषंगिक समस्या विचारात घेण्याच्या प्रस्तावात सहभाग घेतलेला होता. त्यामध्ये त्यांनी राज्यातील उद्योगधंदे याची वाढ मोठ्या प्रमाणात

कशी होईल .या उद्योगधंद्याच्या वाढीस त्यांनी निश्चित धोरण आखून त्या धोरणाची अंमलबजावणी होते कि नाही याची काळजी घेतली .तसेच हे उद्योगधंदे मुंबई व पुणे या भागामध्येच न उभारता ते मुंबई व पुण्याच्या बाहेर देखिल या उद्योगांचा विकास कसा होईल याचीही त्यानी काळजी घेतली.त्यासाठी त्यांनी या उद्योगासाठी पाणी,जमीन,व विज उपलब्ध करुन दिली.तसेच या उद्योगधंदाना महाराष्ट्र स्टेट फायनान्शियल कार्पोरेशनच्या वतीने कर्जे देण्याची सोय उपलब्ध करुन दिली व या कार्पोरेशनचे मुख्य ध्येय बाहेरच्या उद्योगधंदाना प्राधान्य देणे हेच ठरवून उद्योगधंदाना प्रोत्साहन देण्याचे कार्य चालू ठेवण्याची तरतूद केली .

राज्यातील उद्योगधंदे बाहेर नेण्याकरिता आणखी एक संस्था निर्माण केली तिचे नाव सिकॉम होय. या संस्थेचे कार्यक्षेत्र हे फक्त पुणे हे आहे. अनेक लोकांना उद्योगधंदामध्ये पैसे गुंतवण्यास कमी पडतात हे लक्षात आल्यावरुनच १९६६ मध्ये संस्थेची स्थापना करुन लोकांना उद्योगधंदासाठी प्रोत्साहित केले.

तसेच एम.आय.डी.सी.या संस्थेने केवळ मुंबई-पुणे हेच कार्यक्षेत्र न मानता नागपूर,चांदा,सोलापूर,कोल्हापूर ,रत्नागिरी अशा अनेक ठिकाणी औद्योगिकरण घडवून आणण्याचा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मा.बापूंनी सांगितले.[35]

मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात बंद पडणा-या सिने-स्टुडिओसंबंधी अल्पकालीन चर्चा --

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योगमंत्री असताना मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात बंद पडणा-या सिनेस्टुडिओ संबंधी माहिती घेऊन सिने-स्टुडिओ (फिल्मसिटी) महाराष्ट्रात काढण्याची तरतूद केली.तसेच या फिल्मसिटीस मुंबईमध्ये आरे कॉलनी येथे जागा दिली व महाराष्ट्रामध्ये फिल्म सिटीस प्रोत्साहन देऊन त्यांना जास्तीत जास्त प्रोत्साहित करण्यासाठी समाजकल्याण खात्यमार्फत दरवर्षी चित्रपट महोत्सव भरविण्यास सुरुवात करुन पहिल्या,दुस-या व तिस-या नंबरच्या चित्रपटाला अनुक्रमे १२,६ व ४ हजाराचे बक्षिस देण्याची सोय उपलब्ध केली व स्टुडिओजला निरनिराळ्या सवलती देण्याच्यादृष्टीने चित्रपट नगरी निर्माण करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले.तसेच स्टुडिओसाठी,मशीनरीसाठी

मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करण्याची तरतूद केली तसेच मुंबई व पुण्यासारख्या ठिकाणी थिएटर्स बांधावीत यासाठी सूचना करण्यात आल्या, त्यामुळे चित्रपट सिने-स्टुडिओचा प्रसार महाराष्ट्रभर झाला असल्याचे दिसून येते.[३६]

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळावरच्या अहवालावर चर्चा --

मा.राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळाच्या अहवालावर माहिती देत असताना हे महामंडळ सुरु झाल्यापासून ते ३१ मार्च १९६८ पर्यन्त एकूण १,७७१ अर्जावर कर्ज दिले, असल्याचे सांगून ही रक्कम २७ कोटी ९ लक्ष ३७ हजार रुपये आहे. या महामंडळाने आपले कार्य अतिशय प्रामाणिकपणे केले असल्याचे दिसून येते. हे महामंडळ स्थापन केले याचा उद्देश ग्रामीण भागामध्ये जास्ती--त जास्त उद्योगधंद्याच्या विकास व्हावा व उद्योग निरनिराळ्या क्षेत्रात त्याची वाढ व्हावी यासाठी या महामंडळाने कमितकमी व्याज दर आकारुन कर्ज देण्याची व्यवस्था करुन ग्रामीण व मागासलेल्या विभागातील लोकांच्या विकासाची प्रथम काळजी घेतली.तसेच छोटे-छोटे लघुउद्योग ग्रामीण भागातील लोकांनी उभा करावित यासाठी प्रोत्साहित केले.यासाठी ग्रामीण विभागामध्ये जाऊन तेथे उद्योगधंदे उभारण्याकरिता प्रचार करण्याची तरतूद केली गेली, त्यामुळे या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या शाखा मिरज,पणजी,औरंगाबाद ,नागपूर,पुणे,जळगांव इत्यादि अनेक ठिकाणी उघडल्या गेल्या आहेत.तसेच या वित्तीय महामंडळाद्वारे उद्योगांना टेक्निकल ज्ञान मिळावे म्हणून टेक्निकल विंगची स्थापना केली गेली. तसेच शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज सहकारी बॅन्केमार्फत देण्याचे धोरण मा.बापूनी शासनाच्या वतीने ठरवून सहकारी बॅन्केमार्फत कोटयावधी रुपये शेतकऱ्यांना मिळवून दिले त्यामुळे या सोईमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला व छोटया उद्योगधंद्यास कर्ज मिळण्यास मदत झाली, त्यामुळे या वित्तीय महामंडळाचे कार्य प्रगतीसाठी महत्वपूर्ण ठरले आहे.[३७]

महाराष्ट्र सिमेंट कंपनीचा संकल्पित सिमेंट कारखाना --

मा.बापूंनी महाराष्ट्र सिमेंट कंपनी लि., ही कंपनी फेब्रुवारी १९६५ मध्ये स्थापन करुन यवतमाळ जिल्हात चुनखडीचा मोठ्या प्रमाणात साठा असल्याने व

या कारखान्यासाठी तांत्रिक सहाय ए.सी.सी.कंपनीमार्फत मिळवून या जिल्हामध्ये एक महत्वपूर्ण कारखाना निर्माण करुन या जिल्हाच्या आद्योगिक विकासात भर घालण्याची कामगिरी पार पाडली.तसेच चंद्रपूर जिल्हातील घुगूस या गावीही एक सिमेंटचा कारखाना उभारणीसाठी त्यानी प्रयत्न केल्यामुळे या कारखान्याची निर्मिती होऊ शकली.

तसेच मा.राजारामबापू पाटील यानी पुण्यामध्ये हडपसर जवळ चुनखडी चे साठे सापडले त्याचाही उपयोग त्यानी सिमेंट कारखान्यासाठी केला. त्यामुळे सिमेंटचे कारखाने सर्वत्र महाराष्ट्रभर फोफावल्याचे दिसून येते. या सिमेंट प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला,त्यामुळे त्यांना या प्रकल्पामुळे दिलासा मिळाला.[३८]

साखर कारखान्यांची मोठ्या प्रमाणात भरभराठ केली --

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योगमंत्री असताना एक महत्वपूर्ण व धोरणात्मक निर्णय घेतला तो म्हणजे उद्योगधंदाचा विकास घडवून आणण्यासाठी सहकार व शासन माध्यमातून साखर कारखान्याची उभारणी केली.व या उभारणीला केन्द्र शासनाने देखील पूर्ण सहाय्य केले.त्यामुळे मा.बापूंनी मराठवाड्यामध्ये गोदावरी धरणाच्या पाण्यावर आधारित १० ते १५ सहकारी साखर कारखाने सुरु करण्यास परवानगी दिली.महाराष्ट्रातील आर्थिक परिस्थिती वर आधारित अशा अनेक कच्चा मालावर आधारित साखरेच्या कारखान्याला प्रोत्साहन दिले.तसेच मा.श्री काळदाते यांच्या प्रश्नाचे उत्तर देऊन साखर कारखान्यावर आधारित असलेले कागद कारखाने,अल्कोहोल,दारु यांचेही कारखाने निघावेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केले व साखरकारखान्यावर आधारित कागद कारखाने आर्थिकदृष्ट्या परवडणारे असल्याने शास्त्रशुध्द तपासणी करुन कागदकारखाने निर्माण करणे सोपे जाईल.या उद्देशाने मा.बापूनी साखर कारखान्यांची मोठ्या प्रमाणात वाढ व्हावी यासाठी सामान्य शेतकऱ्यांना व उद्योजकांना प्रोत्साहित केले त्यामुळे महाराष्ट्रामध्ये साखर कारखान्याची भरभराठ घडून आलेली दिसून येते.[३९]

त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या पीकांना योग्य वेळी योग्य वेळेला खते

उपलब्ध व्हावीत त्यांना शेतीच्या पिकामध्ये वाढ घडवून आणण्यासाठी सहकारी तत्वावर चालणा-या खताचा कारखाना काढण्यासाठी अनेकांना उत्तेजन देण्यात आले, त्यामुळे खताचे कारखाने महाराष्ट्रामध्ये वाढू लागले. त्यांचा उपयोग शेतक-यांना मोठ्या प्रमाणात झाला.[४०]

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योग मंत्री असताना महाराष्ट्र राज्याची उद्योगधंद्याची वाढ व प्रगती घडवून आणण्यासाठी बरेच कारखाने राज्य सरकारतर्फे स्टेट सेक्टर, पब्लिक सेक्टर आणि को.ऑप.जाईन्ट सेक्टर आणि प्रायव्हेट सेक्टरला अनुसरुन अनेक लघुउद्योग व मोठे कारखाने सुरु करण्याचा प्रयत्न केला त्याच-बरोबर जॉईंट सेक्टरमध्ये उद्योगधंदे कसे कसे निर्माण होतील याचीही त्यांनी पहाणी करुन निर्णय घेतले त्याच बरोबर स्टेट सेक्टरनुसार --

१) शार्क लिव्हर ऑईल स्कीम, मुंबई,

२) फिक्कप्रिझिंग प्लँट, कोल्ड स्टोअरेज अण्ड ऑईल, ससून डॉक, कुलाबा मुंबई

३) पोल्ट्री ड्रेसिंग प्लँट, पुणे

४) बेकन फॅक्टरी, बोरिवली,

५) हाफकिन इन्स्टिटयूट, मुंबई

६) श्री शाहू छत्रपती मिल्स, कोल्हापूर

७) नरसिंगगिरजी मिल्स सोलापूर आणि

८) गव्हर्नमेन्ट डिस्टीलरी, चितळी, जि: अहमदनगर .इत्यादि अनेक उद्योगधंदे सुरु केले व त्या कारखान्यांना सर्व सोई उपलब्ध दिल्या.

तसेच राज्यामध्ये छोटे-छोटे उद्योगधंदे उभारण्यासाठी स्मॉल स्केल इंडिस्ट्रीज द्वारे उत्तेजन देण्यात आले आहे. तसेच मा.बापूंनी जे धोरण राज्यासाठी वापरले होते तेच धोरण पुढे देशाने वापरले. यावरुन मा.बापूंची अभ्यासूवृत्तीचे सर्वत्र स्वागत केले होते.[४१]

खादी ग्रामोद्योग मंडळाच्या कामकाजावर चर्चा --

मा.श्री राजारामबापू पाटील यांनी उद्योगमंत्री असताना खादी ही कॉंग्रेसची असा जो विचार होता तो खोडून काढून हा गैरसमज त्यांनी दूर करण्याचा प्रयत्न केला व खादी ग्रामोउद्योग हा खेड्यामध्ये चालतो तो व्यवसाय खेड्यातील लोकांचे उपजिविकेचे साधन मानले जाते,त्यामुळे खादी मंडळावर कॉंग्रेसची खादी आहे असे न मानता या उद्योगामुळे देशातील लाखों लोकांना यामुळे कामे मिळणार असल्याने व हाउद्योग बंद पडल्यामुळे हजारो लोक बेकार होतील त्यामुळे खादी उद्योगाला भक्कमपणा प्राप्त करुन देण्याची मा.श्री.बापूंनी प्रयत्न केले व खादी मंडळाच्या उत्पादनात वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

खादी उद्योगात कमी मजूरी मिळत असल्याने खादी उत्पादन कमी निघत होते.खादीउद्योगात काम करणाऱ्यांना अधिक मजूरी देण्यात यावी यासाठी प्रयत्न केले.या मंडळामार्फत जळगाव जिल्ह्यात एक केन्द्र चालू करण्यात आले.नशिराबाद येथे जळगाव जिल्हा सेवा समितीने हे केन्द्र चालविले.या ठिकाणी १ लक्ष १७ हजार रुपये किंमतीची ३४७९३ वार खादी निर्माण होऊन ११० लोकांना रोजगार मिळाला.यापैकी सूतकताईचे काम करणाऱ्या बहुतांशी स्त्रिया आहेत.या लोकांना दीड रुपया मजूरी मिळत असे त्यांना मजूरी वाढवून देण्याचा मा.बापूंनी प्रयत्न केला. तसेच वर्धा जिल्ह्यात काही संस्था या चरख्याचा वापर करतात हा चरखा वापरण्यासाठी या खादी ग्रमोद्योग मंडळाकडून मिळेल याचीही व्यवस्था केली.

खादी उत्पादनात विशेष सुधारणा व्हावी यासाठी या मंडळाने बरेच प्रयत्न केले.या मंडळाकडून निरनिराळ्या उद्योगाद्वारे करण्यात येणारे उत्पादन,विक्री व रोजगार याचे सन १९६५-६६,१९६६-६७,व १९६७-६८ या वर्षांचे तुलनात्मक पाहिले तर त्या उद्योगाची प्रगती झालेली दिसते. मध माशा पालन उद्योगात १९६५-६६ साली २१८० लोक त्या ठिकाणी कामाला होते.१९६७-६८ मध्ये २२२३ लोकांना रोजगार मिळाला.म्हणजे यामध्ये विकास घडून आल्याचे दिसून येते.तसेच तेल घाणीच्या उद्योगात १९६५-६६ मध्ये २ कोटी ५८ लक्ष रुपयाचे उत्पादन झाले

आणि ६२७४ लोकांना रोजगार मिळाला. चर्मोद्योगात १९६५-६६ मध्ये ८४९ लोकांना रोजगार मिळत होता. कुंभार उद्योगात १९६५-६६ मध्ये ५१६२ लोकांना रोजगार मिळाला होता. वाख उद्योग, सुतार काम व लोहार कामातही या योजनेचा फायदा घेणाऱ्याच्या संख्येत वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न केला. कामगारांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याच्यादृष्टीने या मंडळाने राज्यामध्ये चांगले कार्य केलेले आहे. या मंडळाचे सर्व उत्पन्न हे राज्याचे नसून दिल्ली खादी आयोगाकडून येणारे उत्पन्न असल्याचे सांगून, जळगाव जिल्हामध्ये केळीचे खूंट वाया जाते, त्या खुंटांचा उपयोग वाक तयार करण्यासाठी केला. वाक तयार करण्यासाठी जे यंत्र लागते त्याची किंमत १ हजार रुपये आहे. जळगाव जिल्हात असे यंत्र प्रत्येक शेतावर बसविले तर वाकही तयार होईल व त्यानंतर राहिलेला जो भाग राहिल त्यापासून खत देखिल निर्माण होईल अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न करण्यात आला. खेड्यामधून अनेक लहानमोठे उद्योगधंदे निर्माण कसे होतील याचा सूक्ष्म व अभ्यास वृत्तीने मा.श्री राजारामबापू पाटील यांनी अभ्यास करुन महत्वपूर्ण सुधारणा घडविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.[४२]

राष्ट्रीय विकासाच्या कामातील जबाबदारीची जाणीव शासकीय कर्मचाऱ्यांना करुन देण्यासाठी समिती नेमणे --

मा. राजारामबापू पाटील यांनी उद्योगमंत्री असताना राष्ट्रीय विकासाच्या कामातील जबाबदारीची जाणीव शासकीय कर्मचाऱ्यांना करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना योग्य पध्दतीने वागणूक मिळावी, त्यानी उत्तम काम करण्याची आवश्यकता आहे असा त्यांना उपदेश व्हावा यासाठी प्रयत्न केले. सरकारी कर्मचाऱ्यांनी विधायक कृत्यापासून लांब राहून देशाची एकता व अखंडता टिकून राहण्यासाठी देशप्रेम निर्माण व्हावे यासाठी त्यानी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. तसेच हा उच्च तो कनिष्ठ हा वरच्या वर्गातील असा भेदभाव न करता सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीना समानतेने वागण्याचे हक्क बहाल केले.

तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना सरकारी दवाखान्यातून मोफत औषधे देण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे वरील सर्व सुविधामुळे शासकीय विकासाच्या कामातील जबाबदारीची जाणीव कर्मचाऱ्यांना खात्रीने झाल्याचे दिसून येते.[४३]

<u>कोल्हापूर- शिये येथील घटना --</u>

मा. राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री असताना कोल्हापूर नजिकच्या शिये गावातील ८२ छोटया शेतकरी कुटूंबाची ११७ एकर शेतजमिन व खोरी नावाची पंचवीस शेतकऱ्याची वाडी सदृश वसाहतीची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी (एम.आय.डी.सी.साठी ) संपादन करण्यात आली होती. वास्तविक हे भूमिसंपादन कार्य अत्यंत अव्यवहारीदृष्टया व सर्वस्वी अविचारीपणे झाले होते. या शेतकऱ्यांच्यावरील अन्यायाचे गाऱ्हाणे मा.श्री. कारखानीस यांनी विधान सभेच्या विनंती अर्ज समितीकडे नेले. या समितीने सरकारी अधिकाऱ्यांच्याकडून झालेल्या या अन्याय कृत्याची संपूर्णपणे शहानिशा केली व त्या संबंधित छोटया शेतकऱ्याची ११७ एकर जमिन व `खोरी` वसाहतीची जागा याचें संपादन `रद्द` करण्याची शिफारस सरकारच्या उद्योग खात्याकडे केल्यानंतर उपरोक्त शेत जमिनी ऐवजी नजीकच्या माळरान व खडकाळ जमिन घेणे इष्ट व श्रेयस्कर ठरले असते अशी न्याय व वास्तववादी भूमिका उद्योगमंत्री श्री राजारामबापूनी घेतली, त्यामुळे त्या संकटमय शेतकऱ्यांना त्याची जमिन व `खोरी` वसाहतीची जागा परत मिळाली, त्यामुळेच मा. बापूंनी राज्यकारभारातील संवेदनशीलता पुन: सर्वसामान्य जनतेच्या प्रत्ययास आली.[४४]

विधानसभेच्या समित्यांच्या अनेक शिफारशी नाकारण्याकडे नोकरशाहीचा वाढता कल अलिकडे प्रकर्षाने दिसून येतो. नोकरशाहीच्या सल्ल्यावर ताल धरणाऱ्या मंत्र्यांची संख्या अलिकडे वाढत चाललेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील वैधानिक लोकशाहीला दिवसेंदिवस अधिकाधिक पायबंद घातला जात आहे. या चिंताजनक पार्श्वभूमिवर विचार केला तर मा. बापूंच्या उपरोक्त भूमिकेचे व निर्णयाचे मूलगामी व श्रेष्ठत्व सिध्द होते.

जनतेवरील अन्यायासंबंधी अथवा सरकारी अधिकाऱ्यांच्या बेकायदेशिर व पक्षपाती कृत्यासंबंधी लोकप्रतिनिधीने मग तो सत्ताधारी पक्षाचा अथवा विरोधी पक्षाचा असो तक्रार मांडली तर त्या तक्रारीचा निकाल करताना संबंधित मंत्र्यांची भूमिका न्याय व नि:पक्षपाती असणे हे वैधानिक लोकशाहीच्या निकोप वाढीच्या दृष्टीने अत्यावश्यक असते. मंत्री म्हणून राज्यकारभार करीत असताना मा. श्री. राजारामबापू पाटील यांनी अनुकरणीय भूमिकेचा स्वीकार केला होता. म्हणून त्यांच्या या प्रशंसनीय निर्णयामुळेच विधानसभेच्या कार्याच्या इतिहासात हे प्रकरण म्हणजे वैधानिक लोकशाहीच्या महत्वपूर्ण परंपरेचा एक उत्कृष्ट व गौरवशाली नमुना होय, अशी नोंद झाली आहे.[४५]

<u>मराठी माणूस व नॅशनल फर्टिलायझर्स --</u>

मा. श्री राजारामबापू पाटील हे महाराष्ट्राचे उद्योगमंत्री असताना एक महत्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. सन १९६७ च्या वेळी मुंबईमध्ये शिवसेनेचा उदय मोठ्या प्रमाणावर झाला होता. व ही चळवळ झपाट्याने मुंबई शहरामध्ये पसरली होती. मराठी माणसाला मुंबईमधील कारखान्यामध्ये उद्योगधंद्यामध्ये बुध्दीपुरस्पर डावलण्यात येते, त्यामुळे मराठी माणसाला मुंबईत नोकरीमध्ये अग्रक्रम मिळाला पाहिजे अशी याची मागणी होती, त्यामुळे महाराष्ट्रामध्ये मुंबई आहे परंतु मुंबईमध्ये महाराष्ट्र नाही अशी तक्रार वारंवार पुढे येत होती याचवेळी मुंबई येथील नॅशनल फर्टिलायझर्स कार्पोरेशन या केन्द्र सरकारच्या महामंडळाबद्दल मा. श्री. राजारामबापू पाटील यांच्याकडे तेथे मराठी मार्गीक माणसाला नेमणूकीच्यावेळी मुद्दामच वगळण्यात येते अशी तक्रार करण्यात आली. मा. बापूंनी या मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांच्याशी चर्चा केली आणि योग्य गुणी मराठी माषिक माणसांना नोकरीत घेण्याबद्दल आग्रही भूमिका घेतली. यामागे, त्यांच्या मनात कोणताही प्रादेशिक, माषिक, अहंकाराची, संकुचित भावना नव्हती. मुंबईमध्ये माषिक, जातीय, प्रादेशिक चळवळी वाढल्या तर देशाच्या एकात्मतेला तडा जाईल ही त्याची यामागील मुख्य भूमिका होती. श्री. राजारामबापू पाटील या नॅशनल फर्टिलायझर्स कार्पोरेशनच्या कामामध्ये लक्ष घातले. त्यावेळी तेथे नोकरीमध्ये फक्त ११ टक्के मराठी माषिक लोक होते पुढे-४-५ वर्षामध्ये हे प्रमाण

३३ टक्क्यापर्यन्त गेले. मराठी माणीकावरील अन्याय दूर झाला, पाहिजे परंतु राष्ट्रीय एकात्मतेच्या मुख्य प्रवाहापासून आपण दूर जाता कामा नये अशा भूमिकेवरुन त्यांनी केलेली कार्य आजही अनेकांना मार्गदर्शक ठरलेली आहेत.[४६]

महाराष्ट्र राज्यामध्ये ग्रामीण भागात वाढलेले उद्योगधंदे हा मा.राजाराम बापू पाटील यांच्या दूरदृष्टीचा चमत्कार होता.त्यांनी अंगिकारलेले ध्येय मूर्त स्वरुपात पाहण्याचे परमभाग्यही त्यांना लाभले.ग्रामीण भागाचा होणारा आर्थिक कायापालट आणि युगानुयुगे दारिद्र्यात राहणारे ग्रामीण लोक आर्थिक सुबत्तेच्या दृष्टिक्षेपात पहाताना मा.बापू हर्षभरीत होत असत.त्यांच्या चेह-यावर भउटणा-या कर्तव्य पूर्तीच्या छटा अवर्णनीय अशाच होत्या.

मा.बापूंनी आपल्या जीवनात अनेक उच्च पदस्थाने भुषविली त्या त्या पदाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.सत्तेचा वापर लोक कल्याणासाठी करण्याची त्यांची प्रवृत्ती होती आणि ती त्यांच्या कार्यपध्दतीचा स्थायी भाव होता. सत्तास्थाने भोगत असताना त्या सत्तेचा वापर समतोल राखण्यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केला. सत्तेमुळे ते कधीही बेभान झाले नाहीत. कार्यकुशलतेने त्यांनी आपले वेगळेपण वेळोवेळी सिध्द करुन दाखविले तसेच सर्व समाजास आपलेसे करुन घेतले[४७] होते.

मा.ना.राजारामबापू पाटील यांनी उद्योग व वीज मंत्री असताना या महाराष्ट्र राज्यामध्ये आद्योगिक विकास मोठ्या प्रमाणामध्ये घडवून आणण्याचा प्रयत्न केला.लघुउद्योग सुरु करण्यास अनेकांना प्रोत्साहन दिले. ग्रामीण व शहरी विभागामध्ये उद्योगधंद्याचे व वीजेचे जाळेच पसरले गेले.

<u>महाराष्ट्रामध्ये उद्योग धंद्याची व रोजगारीची वाढ होण्यासंबंधी काही सूचना --</u>

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योग व वीजमंत्री असताना बेकारी निवारणाचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्व क्षेत्रामध्ये कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला.शेती,जलसिंचन योजना,बांधबंदिस्ती,घर बांधणी योजना,रस्ते,वहातुक,व्यापार आणि उद्योगधंदे इत्यादि क्षेत्रामध्ये नोकरी धंदा वाढविण्याचा प्रयत्न केला.

मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योग व वीज मंत्री असताना उद्योगधंद्याच्या वाढीसाठी अनेक योजना आखल्या होत्या. लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले होते, त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत ४९ औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या होत्या. व २० नवीन वसाहतीचे नियोजन केले होते. तसेच १३०० लघु उद्योग सुरु केले होते. व त्यामध्ये एकूण १८,३०० कामगार काम करीत होते. तसेच अनेक वित्तीय महामंडळे, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळे स्थापन करुन उद्योगधंद्याचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीमध्ये उद्योगधंद्याची भरभराट झालेली दिसून येते.[४८]

विजेकरिता आर्थिक सहाय्य --

ग्रामीण भागामध्ये ज्या ठिकाणी वीजेवरील दर जास्त आहेत अशा ठिकाणी लघु उद्योगाना त्यानी वापरलेल्या वीजेवर आर्थिक सहाय्य देण्यात आल्याची माहिती देऊन हे आर्थिक सहाय्य त्यानी भरलेल्या वीजेचा दर युनिटमागे आकार आणि ९ पैसे. मधील फरक एवढे मिळते या आर्थिक सहाय्याची मर्यादा जास्तीत जास्त दर युनिटमागे ९ पैसे आहे. आणि दरमहा हे आर्थिक सहाय्य लघु उद्योगाने वापरलेल्या ३,००० युनिटपर्यन्त मर्यादित असून हे वीस अश्वशक्तीपेक्षा जास्त अश्वशक्ती वापरणाऱ्या कारखान्यांना हे आर्थिक सहाय्य मिळू शकत नसल्याची माहिती मा.बापूंनी दिली.

कच्च्या मालाची मदत --

राज्याच्या अविकसीत भागात लघु उद्योग झपाट्याने वाढावेत म्हणून अशा उद्योगांना लागणारा कच्चा माल पुरविण्यामध्ये अविकसित भागाला जास्त प्राधान्य मिळते व अग्रक्रम दिला जातो. देशामध्ये उत्पादित केला जाणारा दुर्मिळ कच्चामाल व परदेशातून आयात केलेला कच्चा माल जास्तीतजास्त या मोठ्या प्रकल्पाला पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली.[४९]

रोजगारामध्ये औद्योगिक प्रगतीमुळे इतकी वाढ झाली असली तरी हे रोजगार स्थानिक लोकांना मिळण्यामध्ये यश न येता त्यातील बराचसा वाटा या राज्याबाहेरुन आलेल्या लोकांना मिळाला आहे ही उणीव दूर करण्यासाठी राज्य सरकारने उद्योगधंद्यामध्ये स्थानिक लोकांना अग्रक्रमाने रोजगार मिळवून

देण्यासाठी अनेक प्रयत्न केले व बेकारी निवारण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले. तसेच मा.बापूनी वेतन व उत्पादकता याची सांगड घालून वेतनवाढ ही उत्पादन क्षमतेवर अवलंबून असण्याची तरतूद केली.

उद्योगधंद्याची मजूरी प्रधानता दिवसेदिवस उद्योगधंद्याचा कल भांडवलप्रधान धंदे आधिकाधिक प्रमाणात काढण्याकडे होत आहे.त्यामुळे कोणत्याही उपयुक्त कसोटीवर ठरवलेल्या क्षेत्रातील उद्योगधंद्याना त्यांची मजूरीप्रधानता विशिष्ठ मर्यादेच्या पेक्षा अधिक असल्याशिवाय परवाने देवू नयेत अशी तरतूद करण्यात आली.[५०]

सुशिक्षित बेकारांना उद्योगधंदे काढण्याकरिता आर्थिक मदत --

तरुणांना स्वत:च्या हमीवर दोन हजार रुपया पर्यन्त कर्ज मिळू शकते ही रक्कम फार अपूरी आहे. कर्जावरील ही मर्यादा स्वत:च्या हमीवर पाच हजार पर्यन्त आणि जामीन आणल्यास आणखी वीस हजार,अशी पंचवीस हजारपर्यन्त नेल्याची तरतूद करुन ह्यामुळे सुशिक्षित बेकारांना स्वत:चा धंदा करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

वीज --

वीज वापरावर आर्थिक सहाय्य देत असताना अश्वशक्तीवर नियंत्रण आहे म्हणून सर्व वापरावर सहाय्य द्यावे त्यात ३००० युनिटसचे नियंत्रण असू नये असी तरतूद केली. तसेच वीज केवळ उद्योगधंद्याचाच नव्हे तर सर्वंगामी उन्नतीकरिता वीजेचे जाळे राज्यभर पसरविणे आवश्यक आहे.यासाठी विजेची निर्मिती आणि वितरण याकरिता योग्य ती आर्थिक तरतूद करुन राज्य शासनाच्या वीज महामंडळाच्या अंदाजपत्रकात मिळून ह्या कामासाठी सुमारे पाच कोटी रुपयाची तरतूद केली व पुढील तीन वर्षात इतकीच तरतूद राहिल्यास एकूण १५ कोटी रुपये कामास उपलब्ध होतील.याशिवाय शेतकी पंपास वीज पुरविण्यासाठी मिळणाऱ्या शेतकी विषयक आर्थिक महामंडळाची रक्कम व ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून मिळणारी रक्कम लक्षात घेता आणी १०,००० खेड्यांना वीज पुरविणे शक्य असल्याचे मा.राजारामबापू पाटील यांनी स्पष्ट सांगितले.[५१]

यंत्रमाग --

त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक कापड गिरण्या बंद पडल्या असून केवळ बेकारी टाळण्याकरिता या गिरण्या शासनास फार मोठे नुकसाण सोसून चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. रोजगार उपलब्ध करण्यासाठी एक लक्ष पॉवर लूम्स (यंत्रमाग ) स्थापन करण्याचा परवाना भारत सरकारकडून मिळणे महत्वाचे असून त्यामुळे सामान्यपणे तीन लक्ष लोकांना रोजगार मिळणार असल्याची मा.बापूंनी तरतूद केली. त्याच प्रमाणे अविकसित जिल्हात निघणाऱ्या कारखान्यांना स्थिर भांडवल गुंतवणुकीवर १० टक्के अनुदान देण्याची व्यवस्था केली.

टॅक्सी आणि ऑटोरिक्षा परवाने

हे परवाने स्थानिक एस.एस.सी. पर्यन्त शिकलेल्या बेकारांना देऊन सुशिक्षित तरुणांना रोजगारांची संधी प्राप्त करुन दिली.

एम्प्लॉयमेन्ट एक्स्चेंजमार्फत भरती करणे अनिवार्य ठरविणे --

उद्योगधंद्यातून भरती करीत असताना स्थानिक व्यक्तींना अग्रक्रम मिळावा हे धोरण असले तरी सर्व उद्योगधंद्यावर सेवानियोजन मार्फत नोकर भरती करणे अनिवार्य ठरवावे लागेल. याकरिता कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागण्याची त्यांनी तरतूद केली. तसेच नोकरीसाठी उमेदवार निवडताना ज्या उमेदवाराच्या कुटूंबामध्ये एकाही व्यक्तीस नोकरी किंवा कामधंदा नसेल अशाची निवड प्राधान्येकरुन होणे जरुर आहे. सरकारी, निमसरकारी कार्यालये आणि सरकारी कार्पोरेशनमध्ये उमेदवारांची निवड करीत असताना हे बंधन कटाक्षाने पाळले जावे, अशा प्रकारच्या सूचना कारखाने व इतर कार्यालये यांना देण्यात आल्या.

मोठ्या उद्योगाच्या व्यवहारावर नियंत्रण --

भारत सरकारच्या औद्योगिक विकास व नियमन अधिनियम १९५१ प्रमाणे या कारखानींना परवाने देण्यात येतात, त्यांच्या व्यवहारावर प्रथमपासून लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्या संचालक मंडळावर एक सरकार नियुक्त व्यक्ती असावी व त्या व्यक्तीस मताधिकार नसला तरी वेळोवेळी त्या व्यक्तीकडून सरकारला अशा उद्योगांच्या व्यवहाराची माहिती मिळू शकेल. अशा प्रकारची व्यवस्था करण्यात

आली मा.राजारामबापू पाटील यांनी सुक्ष्म अभ्यास करुन जे निर्णय घेतले त्याचा परिणाम म्हणजे ते आजही नियम वापरात असल्याचे व त्यांच्या धोरणामुळे महाराष्ट्र राज्य विकसित झाल्याचे दिसून येते.[५२]

राज्य विद्युत मंडळाच्या कामकाजावर चर्चा --

मा.राजारामबापू पाटील यांनी विजमंत्री असताना राज्य विद्युत मंडळाच्या कामकाजावरील चर्चेत भाग घेवून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आपले कार्य कसे करते व कोणत्या भागात वीज जास्त आहे याची माहिती दिली.ती माहिती सांगत असताना मा.बापूनी मराठवाड्यामध्ये १,३७१ गावाना वीज देण्यात आल्याचे सांगून हे प्रमाण १८.२ इतके असल्याचे सांगितले.त्याचप्रमाणे विदर्भामध्ये २,६६२ गावे आहेत.त्या भागात वीज देण्याचे प्रमाण २१.७५ इतके असून पश्चिम महाराष्ट्रातील ३,३४१ गावाना वीज मिळाली त्याचे प्रमाण २१.३५ इतके असल्याचे सांगितले.तसेच मराठवाडा विभागात १,६२५० विहिरीवर पंप बसविण्यात आल्याची व पश्चिम महाराष्ट्रात ४४,०९४ विहिरीवर पंप बसविले तसेच विदर्भामध्ये २८,९०१ विहिरीवर पंप बसविण्यात आल्याची माहिती दिली.

त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील गावामधील विज उत्पादनाबाबत त्यानी सांगितले की या भागाला कायनेपासून आणि टाटा हैड्रोइलेक्ट्रिक पासून विज मिळते.त्यामुळे मराठवाडा व विदर्भापेक्षा या भागात विजेचा पुरवठा जास्त असल्याची माहिती मा.बापूनी सांगून विजेचे वाटप हे जिल्हावार करण्याचे काम वीज मंडळाकडे सोपवून जास्तीत जास्त वीज कनेक्शन देण्यास परवानगी दिली असल्याची तरतूद केली आहे.[५३]

तसेच मा.बापूनी वीज देण्यामध्ये ज्यांनी कोणी वीज मागितली असेल त्याची रजिस्टर नोंद झाली पाहिजे.व अर्ज करणारांचे रजिस्टर,डिपॉझिट भरणाऱ्याचे रजिस्टर करण्याची तरतूद करुन वीज देण्यामध्ये कोणत्याही प्रकारची हरकत घेऊ नये.

सर्व जिल्ह्यात विजेचा प्रसार व्हावा म्हणून तयार केलेली योजना --

वीजेचा प्रसार राज्यातील सर्व विभागामध्ये व जिल्ह्यात समतोल प्रमाणात व्हावा असे शासनाचे व वीज मंडळाचे धोरण ठरविण्यात येऊन ,ग्रामीण विद्युतीकरणासाठी उपलब्ध होणाऱ्या निधींचा विनियोग या धोरणानुसारच होत असल्याचे सांगून सध्या महाराष्ट्रातील २० जिल्ह्यामध्ये ग्रामीण विद्युतीकरणाचे काम कृषि अर्थमहामंडळाच्या मदतीने सुरु करुन ज्या जिल्ह्याना वा विभागाना या योजनेचा फायदा अजूनपर्यन्त मिळू शकलेला नाही अशा विभागासाठी शासनाने १-५० कोटी रुपयांचा निधी वीजमंडळाला डिसेंबर १९६९ मध्ये उपलब्ध करुन दिला आहे. या निधीतून रत्नागिरी,ठाणे,कुलाबा,चंद्रपूर व भंडारा या पाच अविकसित जिल्ह्यासाठी प्रत्येकी रु.२५ लाख रक्कम तसेच धुळे,नांदेड व यवतमाळ या तीन जिल्ह्यातील अदिवासी भागासाठी राहिलेले २५ लाख रुपयाची रक्कम वीव मंडळाने मंजूर केली असल्याचे सांगून या सर्व योजना फेब्रुवारी १९७० अखेरपर्यन्त तयार करण्यात आल्या असून त्या जून १९७० पर्यन्त कार्यान्वित करण्याचा वीज मंडळाचा प्रयत्न असल्याचे मा.राजारामबापू पाटील यांनी मा.श्री.ए.पा.साळवे (चंद्रपूर ) यांनी विचारल्यावरुन मा.बापूंनी उत्तर दिले.[५३]

राज्यात उद्योगधंदे,शेती व व्यापार यांना प्रोत्साहन --

महाराष्ट्र राज्याचा विकास हा प्रामुख्याने शेती - उद्योगधंदे व व्यापार यावर अवलंबून असल्याने या सर्वांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी लघु - उद्योगकांना शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले.तसेच हे तीन्ही घटक एकमेकांवर अवलंबून असल्याने त्यांना सर्वात महत्वाचा घटक आवश्यक आहे आणि तो म्हणजे वीज .जितके उद्योगधंदे वाढतील तितकी वीज लागणार आहे म्हणून राज्यामध्ये वीजनिर्मिती देखिल घडवून आणणे महत्वाचे असल्याने वीज उत्पादन वाढविण्यासाठी मा.बापूनी चवथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये तारापूर ॲटॉमिक पॉवर स्टेशनच्या बाबतीत आग्रह धरला.कोयना व तारापूर अणू वीजकेन्द्र होत असताना कोणत्याही प्रकारचा गैर व्यवहार होता कामा नये .प्रत्येक विज मंडळातील

अधिका-यांनी शिस्तीचे पालन करुनच वीज पुरवठा केला पाहिजे अशी महत्वाची तरतूद मा.बापूनी केली.

तसेच वीज मंडळाकडून ज्या वीजेचे उत्पादन आणि वितरण होते त्यातील वाया जाणा-या वीजेची टक्केवारी कमी करण्याचा त्यानी प्रयत्न करुन विदर्भा- मध्ये व जास्तीत जास्त वीज पुरवठा करुन तेथील उद्योगधंद्याच्या वाढीस चालना देण्याचे प्रयत्न केले.[५४]

उद्योगधंद्यापेक्षा शेतीला जास्तीत जास्त वीज पुरवठा --

महाराष्ट्र हे शेतीप्रदान राज्य असल्याने बरेच उद्योगधंदे हे शेतीवर अवलंबून आहेत, त्यामुळे शेतीला मोठया प्रमाणात पाणी पुरवठा झाल्याशिवाय शेतीतील पीक मोठया प्रमाणात निघणार नाही, त्यामुळे आधुनिक शेतीला उत्तेजन देण्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे हे ओळखून मा.बापूंनी उद्योग - धंद्यापेक्षाही जास्त शेतीला जास्तीत जास्त वीज पुरवठा करुन शेतक-यांच्यात दिलासा निर्माण केला.[५५]

सरकारने वीज कपातीचा घेतलेला निर्णय याबाबत चर्चा --

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने जास्त खर्च होणा-या वीजेवर नियंत्रण राखण्यासाठी १६ टक्के वीज कपात करण्याचा निर्णय घेतला. तसेच पिठाच्या गिरण्या या वीज कपातीतून मुक्त केल्या, तसेच वीज कपातीचा मजूर । कामगार यांच्यावर अनिष्ठ परिणाम होऊ नये त्यांच्यावर घरी बसण्याची पाळी येऊ नये व वीज कपातीचा कारखान्यावर देखिल परिणाम होऊ नये याचीही काळजी घेण्यात आली.

तसेच महाराष्ट्र राज्याला उद्योग, शेती यासाठी जास्तीत जास्त वीज मिळावी यासाठी तारापूर व नाशिक येथेही वीज प्रकल्प मोठया प्रमाणात तयार करण्याची तरतूद करुन म्हैसूर राज्याकडून जादा विजेची मागणी केली. त्यामुळे गोरगरीब शेतमजूरांना देखिल वीज उपलब्ध झाली. खेडेगावामध्ये वीजेचा प्रचार होऊ लागला, त्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळाला.[५६]

महाराष्ट्रामध्ये निर्माण झाल्यामुळेच महाराष्ट्रातील उद्योगधंद्याना व शेतीला विजेचा उपयोग मोठ्या प्रमाणात होऊ शकला व वीज सामान्य गोरगरीब लोकांच्यापर्यन्त पोचू शकली.[५७]

कमी दरात वीज उपलब्ध करुन दिली --

मा.राजारामबापू पाटील यांनी वीज व उद्योगमंत्री असताना कमीत कमी दरामध्ये सामान्य शेतकऱ्याला उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. शेतीसाठी मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा केल्यामुळे शेतकऱ्याच्यावरील काबाडकष्टाचा बोजा कमी झाला. तसेच लघुउद्योगधंद्याना जमीन, व वीज अल्प दरामध्ये मिळाल्याने उद्योगधंद्याच्या वाढीसाठी उत्तेजन मिळाले. विज महामंडळातर्फे वीज ही ग्रामीण भागामध्ये पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या भरीव कामगिरीमुळेच वीजेचे जाळे ग्रामीण भागामध्ये पोचू शकले.[५८]

सहामाही विजेची बिले वसूल करण्याचा महाराष्ट्र वीज मंडळाचा निर्णय--

मा.उद्योग व वीज मंत्री राजारामबापू पाटील यांनी ग्रामीण विभागातील ग्राहकांना दर महिन्याला वीज मंडळाच्या वीज आकारणी केन्द्रामध्ये पैसे भरणे अडचणीचे होते. विशेषत: शेतकऱ्यांना दर महिन्याला पैसे भरणे जड जाते हा गोष्टी लक्षात घेऊन जिल्हापरिषदा व ग्रामपंचायत याची सूचना लक्षात घेऊन वीज मंडळाने १९६८ पासून ग्रामीण विभागातील (शेतकरी ग्राहक सोडून ) कमी दाबाचा वीज पुरवठा घेणाऱ्या ग्राहकांकडून विजेच्या बिलांची आकारणी दर तीन महिन्यानी व शेतकरी ग्राहकांकडून दर महिन्यानी करण्याचे ठरविले.

या नवीन पध्दतीनुसार ज्याची बील आकारणी तीन महिन्यानी एकदा करावयाची अशी घरगुती वीज वापरणाऱ्या ग्रामीण ग्राहकांकडून सहा महिन्यांच्या बिलाइतकी रक्कम म्हणून अनामत रक्कम म्हणून घेण्यात येईल. शेतकी ग्राहकाकडून सहा महिन्यातून एकदा बील वसूल करण्यात येणार असल्यामुळे आठ महिन्याच्या बिलाइतकी रक्कम अनामत रक्कम म्हणून घेण्यात येणार असल्याची मा.बापूंनी तरतूद केली.[५९]

छापखान्यातील वीजेच्या खपावरील ड्यूटीचा दर --

मा.हशू अडवाणी (चेंबूर) यांना उत्तर देत असताना मा.बापूंनी राज्यातील सर्व छापखान्याच्या विजेच्या खपावरील ड्यूटी दर १ मे १९६७ पासून एका युनिटला १ पैसा या दराने वसूल व्हावा असा आदेश काढून यापूर्वी निरनिराळ्या ठिकाणचे छापखान्याकडून अनुज्ञाप्तिधारक निरनिराळ्या दराने ड्यूटी वसूल करीत .काही ठिकाणी युनिटला १० पैसे हा कमर्शियर धंदांना लागू असलेला दर आकारला जात असल्याची व या दरामुळे शासनाच्या उत्पन्नात घट होणार असून राज्यातील छापखान्यांना याचा जास्तीत जास्त फायदा होणार असल्याचे घोषित केले.[६०]

शेतीच्या विकासासाठी शेतकऱ्यांना वीजपुरवठा करणे ---

मा.श्री देशमुख यांना उत्तर देत असताना एक महत्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये जी वीज निर्माण होते,त्यामधील ५० टक्के वीज शेतीसाठी पुरवण्यात यावी कारण शेतीचा विकास सर्व विकासांच्यापेक्षा महत्वाचा आहे व शेतीवरच सर्व अवलंबून असल्याने तसेच शेतीस प्रोत्साहन मिळावे. शेतीपासून अधिक उत्पादन मिळावे यासाठी वीज पुरवठा अधिक व्हावा .या देशातील शेती समृध्द झाली पाहिजे.अन्नधान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण होण्यासाठी व शेतीच्या कच्चा माल आधिक निर्माण झाला पाहिजे त्याशिवाय उद्योगधंद्यात वाढ होऊ शकणार नाही,यासाठी मा.बापूंनी शेतकऱ्यांच्या हितासाठी हा अत्यंत महत्वाचा निर्णय घेऊन शेतकऱ्याच्या पिकासाठी ५० टक्के वीज राखून ठेवण्याचे धोरण जाहिर केले.[६१]

राज्यात अंमलात असलेल्या वीज कपातीबद्दल नियम २७८ अन्वये प्रस्ताव --

जून १९६९ मध्ये नेहमीपेक्षा फारच कमी पाऊस पडल्याने टाटा ज्या लेक्समधून पाणी घेते ती लेक्स आणि कोयनेचा भाग या ठिकाणी विद्युत निर्मिती कमी प्रमाणात निर्माण झाल्याने वीज कपात करण्याशिवाय शासनास पर्याय उरला नाही.मा.राजारामबापू पाटील यांनी एकदम वीज कपात न करता,थोडी थोडी कपात घडवून कमीत कमी त्रास कसा होईल हा दृष्टिकोन मनासमोर ठेवून

त्यांनी हा कपातीचा निर्णय घेतला.तसेच तारापूर अणुविद्युत केन्द्रापासून कधी व किती प्रमाणात वीज मिळेल,शरावतीची वीज,मध्यप्रदेश कडून मिळणारी वीज, गुजराथ राज्याकडून मिळणारी वीज याचा विचार करुन महाराष्ट्र राज्यात १६ टक्के वीज कपात करण्यात आली.त्याचप्रमाणे वीज कपात घरगुती कामाकरिता वीज वापरणा-यावर लागू करण्यात आली नाही व त्याच्यातर्फे आधी जेवढया विजेचा वापर होत होता तिच्यात वाढ होऊ नये एवढेच निर्बन्ध त्याच्यावर लादण्यात आले.तसेच लग्नसमारंभ प्रसंगी एक किलोवॅट वीज वापरण्यास परवानगी देऊन त्याच्यापेक्षा जास्त वीज हवी असेल तर त्यांनी जनरेटर वापरावा असेही सुचविण्यात आले.तसेच घरामध्ये ४० वॅटस ऐवजी ३० वॅटसचे दिवे लावण्यात यावेत असेही सुचविण्यात आले.[६२]

उद्योगधंदाना या काळात वीज कमी पडू नये याची त्यांनी खबरदारी घेतली.वीज निर्मितीसाठी औष्णिक वीज उत्पादन केन्द्रे जास्तीत जास्त काढली पाहिजेत यासाठी त्यानी प्रयत्न केले व परराज्यातून कमी दराने वीज आणून महाराष्ट्रातील शेतीसाठी व उद्योगधंदासाठी तिचा विनियोग केला. या वेळी मा.बापूंनी वीज महामंडळाच्या चेअरमनपासून ते खालच्या दर्जाच्या कर्मचा-यापर्यंन्त सर्वांशी संपर्क ठेवून योग्य वेळी अचूक निर्णय घेतले. या निर्णयामध्ये त्यांनी कधीही राजकारण आणू दिले नाही.त्यामुळे वीजकपात झाल्यामुळे शेतकरी, किंवा कामगार यानी असंतोष व्यक्त न करता मा.बापूंनी दिलेल्या तरतूदीचे काटेकारपणे पालन केले व परिस्थितीवर मात केली.[६३]

## संदर्भ


१ पाटील लालासाहेब कृ. - दै.अग्रदूत ,सांगली(१९८५)पृ.२.

२ कित्ता - दै.प्रतिध्वनी,सांगली,१७ जानेवारी,१९८६, पृ.३.

३ पाटील बा.ल. - लहकपात्र ,पुणे (१९७०) पृ.३२.

४ कित्ता - पृ.३३.

५ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई ,दि.२ ऑग.,१९६७,

६ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई ,दि.२ ऑग.,१९६७.

७ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई, दि.१० जुले १९६७.

८ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई,दि.१० जुले १९६७.

९ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई,दि.१० जुले १९६७.

१० महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई,दि.१० जुले १९६९.

११ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई,दि.१० जुले १९६९.

१२ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई,१० जुले १९६९.

१३ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.१० जुले १९६७.

१४ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.१० जुले १९६७.

१५ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.१० जुले १९६७

१६ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.१० जुले १९६७.

१७ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.१० जुले १९६७.

१८ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.१० जुले १९६७,

१९ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२३ नोव्हेंबर,१९६७.

२० महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मार्च १९६८.

२१ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मर्च १९६८.

२२ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मार्च १९६८.

२३ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मार्च १९६८

२४ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मार्च १९६८

२५ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मार्च १९६८.

२६ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अॅसम्बली डिबेटस,मुंबई दि.२१ मार्च १९६८.

२७ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह ॲसम्बली डिबेटस,मुंबई,दि.२१ मार्च १९६८.

२८ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह ॲसम्बली डिबेटस,मुंबई,दि.२१ मार्च १९६८.

२९ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह ॲसम्बली डिबेटस,मुंबई,दि.२१ मार्च १९६८.

३० -वरीलप्रमाणे दि.२१ मार्च १९६८.

३१ - वरीलप्रमाणे - दि.२१ मार्च १९६८.

३२ - वरीलप्रमाणे - दि.२१ मार्च १९६८.

३३ - वरीलप्रमाणे - दि.२० फेब्रुवारी,१९६८.

३४ - वरीलप्रमाणे - दि.२० फेब्रुवारी,१९६८.

३५ - वरीलप्रमाणे - दि.२२ जुलै ,१९६८.

३६ - वरीलप्रमाणे - दि.२२ जुलै,१९६८.

३७ - वरीलप्रमाणे - दि.१० जुलै १९६८.

३८ - वरीलप्रमाणे - दि.९ जुलै १९६८.

३९ - वरीलप्रमाणे - दि.११ जुलै १९६९.

४० - वरीलप्रमाणे - दि.११ जुलै १९६९.

४१ - वरीलप्रमाणे - दि.१० एप्रिल १९७०.

४२ - वरीलप्रमाणे - दि.२४ नोव्हेंबर,१९६९.

४३ - वरीलप्रमाणे दि.१४ मार्च १९६९.

४४ कारखानीस टी.एस.(कोल्हापूर) - राजारामबापू:काही आठवणी, १९८५,पृ.१६.,राजारामबापू पाटील स्मरणिका चैतन्यस्मरण,संपा.पाटील शामराव(इस्लामपूर )

४५ कित्ता —,,--- पृ.१७.

४६ प्रा.मुंगुळकर मा.प.,पुणे - राजारामबापू पाटील महाराष्ट्राला मिळालेला वारसा,१९८६,पृ.२७, राजारामबापू पाटील ज्ञान प्रबोधिनी इस्लामपूर,संपा.शामराव पाटील.

४७ श्री मुल्ला शहानवाज - एका पर्वाचा अस्त,१९८६,पृ.३१. राजारामबापू पाटील ज्ञान प्रबोधिनी, संपा.पाटील शामराव

४८ महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्याची व रोजगारीची वाढ होण्यासंबंधी काही सूचना
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
४९ उपरिनिर्दिष्ट - शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
५० उपनिर्दिष्ट - शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
५१ उपनिर्दिष्ट - शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
५२ उपनिर्दिष्ट - - उपनिर्दिष्ट
५३ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अँसम्बली डिबेटस, मुंबई, दि. २७ नोव्हेंबर, १९६८.
५४ उपनिर्दिष्ट - दि. २७ नोव्हेंबर, १९६८.
५५ पाटील एल.के. - मुलाखत, वय. ५०, इस्लामपूर, दि. ३०-१०-१९९३.
५६ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अँसम्बली डिबेटस, मुंबई, दि. १२ डिसें., १९६८.
५७ उपनिर्दिष्ट दि. १२ एप्रिल, १९७०.
५८ उपनिर्दिष्ट दि. २४ एप्रिल १९६९.
५९ आत्तार सी.जी., - मुलाखत, वय ६२, दि. ३०-९-९३,
मुख्याध्यापक, आझाद विद्यालय, कासेगाव.
६० महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही - मंगळवार दि. २३ जुलै १९६८. मुंबई
६१ महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही - मंगळवार दि. २३ जुलै १९६८. मुंबई
६२ उपनिर्दिष्ट ९ फेब्रुवारी १९६८., मुंबई.
६३ महाराष्ट्र लेजिसलेटिव्ह अँसम्बली डिबेटस, मुंबई दि. २६ मार्च १९६९.